स्वादमय सकाळचा नाश्ता
मिसळपाव, वडासांबर, इडलीसांबर, उडिदवडासांबर, मसालाडोसा, उपमा, उत्तपा, शीरा पुरी भाजी,
लोकसेवा प्युअर व्हेज
एम.जी. रोड, अहमदनगर.



संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा | व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

अत्याधुनिक नेत्र शिबीर
आता चष्मा घालवा कायमचा
चष्मा नको?
मोफत नेत्रतपासणी
साई सूर्य नेत्रसेवा
Help line 9112288611 | Appointment 8888982222

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रुपये | अहमदनगर, शुक्रवार दि. २८.०६.२०२४ | अंक नं. १०१ | वर्ष ६७ वे | दैनिक वर्ष ६१ वे | ANR/022/2018-2020

आला रे आला राजपाल सेल आला..!
खरेदीवर आकर्षक गिफ्ट
30% ते 70% डिस्काउंट सेल
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल
• फ्रेश स्टॉक • आकर्षक गिफ्ट • भरपूर व्हरायटी • भरपूर डिस्काउंट
सावेडी अ.नगर (0241) 2999299
संगमनेर (02425) 222226
नारायणगाव (02132) 242132

# ‘मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण’ योजनेची घोषणा; राज्यातील महिलांना मिळणार दरमहा १५०० रुपये

## आर्थिक दुर्बल घटकातील मुलींची फी सरकार भरणार; राज्यातील ४७ लाख ४१ हजार कृषीपंप ग्राहकांचे वीजबिल माफ; अर्थमंत्री अजित पवार यांनी सादर केला राज्याचा अर्थसंकल्प

मुंबई – मध्य प्रदेशातील तत्कालिन शिवराज सिंह चौहान यांच्या सरकारच्या लाडली बहन योजनेच्या धर्तीवर महाराष्ट्रातही ‘मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण’ योजना जाहीर करण्यात आली आहे. त्यानुसार वय वर्षे २१ ते ६० वयोगटातील पात्र महिलांना प्रतिमाह १५०० रुपये देणार असल्याची घोषणा उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी केली आहे. त्याचबरोबर महिलांच्या आरोग्याच्या तक्रारी कमी करण्यासाठी एलपीजीचा वापर वाढावा, असे अधोरेखित करून पात्र कुटुंबांना वर्षाला तीन गॅस मोफत देणार असल्याची मोठी घोषणा करण्यात आली. या योजनेसाठी ४६ हजार कोटींच्या निधीची घोषणा करण्यात आली असून जुलै महिन्यापासून योजनेची अंमलबजावणी करण्यात येणार आहे. आर्थिक दुर्बल घटकातील मुलींची फी सरकार भरणार : वार्षिक ८ लाख उत्पन्न मर्यादा, शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्कात १०० टक्के आर्थिक मदत करण्यात येणार आहे. राज्याच्या एकूण खर्चासाठी ६ लाख १२ हजार २९३ कोटी रुपयांची तरतूद असलेला अतिरिक्त अर्थसंकल्प अर्थमंत्री अजित पवार यांच्याकडून सादर करण्यात आला.

शेतकऱ्यांना मोफत वीज उपलब्ध करुन देता यावी यासाठी मागेल त्याला सौरपंप या योजनेतून ८ लाख ५० हजार शेतकऱ्यांना असे पंप उपलब्ध करून देण्याचं मी जाहीर करत आहे. यावेळी त्यांनी मोफत या शब्दावर भर दिला. तसंच यानंतर एक शेरही त्यांना म्हटला. तुफानों में संभलना जानते है अंधेरों को बदलना जानते है. चिरागों का कोई मजहब नहीं है ये हर महफिल में जलना जानते है! असा शेर अजित पवारांनी सभागृहाला ऐकवला. हयात लेके चलो, कायनात लेके चलो चलो तो सारे जमाने को, साथ लेकर चलो. हा दुसरा शेरही काही वेळापूर्वी अजित पवारांनी सभागृहात ऐकवला.



मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजनेअंतर्गत महिलांना दरवर्षी तीन सिलिंडर मोफत देण्यात येणार असून, याचा अंदाजे दोन कोटी कुटुंबांना फायदा होणे अपेक्षित आहे. महिलांच्या आरोग्याच्या तक्रारी कमी करायच्या असतील तर त्यांना स्वच्छ इंधन देणे ही आपली जबाबदारी आहे, असे सांगत एलपीजी सर्वांत सुरक्षित असल्याने इंधनाचा वापर वाढला पाहिजे. त्यामुळे गॅस सिलेंडर प्रत्येक घराला परवडला पाहिजे यासाठी पात्र कुटुंबाला तीन गॅस मोफत देणार असल्याचे अजित पवार यांनी सांगत मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजना तसेच महिलांसाठी पिंक रिक्षा खरेदी योजना आदी घोषणा करण्यात आल्या.

बचत गटाच्या निधीत वाढ करण्यात आली आहे. आधी १५ हजार रुपये निधी दिला जायचा. आता तो ३० हजार रुपये करण्यात आला आहे. सरकारी रुग्णालयात स्तन, गर्भाशय चाचण्या मोफत होतील.

विवाहित मुलींसाठी राबवण्यात येणाऱ्या शुभमंगल योजनेच्या निधीत वाढ करण्यात आली आहे. हा निधी १० हजारांवरुन २५ हजारांवर नेण्यात आला आहे. यावर्षी २५ लाख महिलांना लखपती दीदी करण्याचा संकल्प महायुती सरकारनं केला आहे. राज्यात १० हजार पिंक रिक्षा महिलांना देण्यात येतील. व्यावसायिक शिक्षणामध्ये आठ लाख रुपयांचं उत्पन्न असलेल्या मुलींना शंभर टक्के सवलत दिली जाणार आहे.

शैक्षणिक संस्थातून ११ लाख विद्यार्थी पदवी घेतात असून डिप्लोमा करणारे विद्यार्थी मोठे आहे. त्यांना औद्योगिक क्षेत्रात काम केल्यास त्यांना रोजगार मिळणार. दरवर्षी १० लाख तरुण तरुणींना प्रत्यक्ष कामावरील अनुभव येण्यासाठी मुख्यमंत्री कार्यप्रशिक्षण योजना राबवली जाणार आहे. यासाठी दरवर्षी १० हजार रुपये देण्यात येणार आहे. त्यासाठी १० कोटीची तरतूद केली आहे. दरवर्षी ५० हजार युवकांना कार्यप्रशिक्षण देण्यात येणार आहे.

महात्मा ज्योतीराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेअंतर्गत पीककर्जाची नियमित परतफेड करणाऱ्या १४ लाख ३३ हजार शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर रक्कम ५१९० कोटी रुपये देणार. उर्वरित रकमेचेही वाटप लवकरात लवकर करण्यात येणार आहे. नानाजी देशमुख कृषी संजिवनी प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यात मराठवाडा आणि विदर्भातील १६ जिल्ह्यांसाठी ५४६९ कोटी रुपयांच्या विविध योजना यशस्वी पूर्ण झाले आहेत. या योजनांचा ६ हजार कोटी रुपये किमतीचा दुसरा टप्पा २१ जिल्ह्यांत राबवले जाणार आहे. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्पाअंतर्गत

(पुढील मजकूर पान २ वर)

Career Ki Shuruwat DISHA ke saath
GET READY FOR YOUR JOB
2 लाखाहून अधिक विद्यार्थ्यांनी अनुभवलेला कोर्स
DCGA
JUST IN 8900/-
JOIN TODAY
MS-OFFICE | TALLY PRIME | GST | CORELDRAW | ILLUSTRATOR | PHOTOSHOP | WEB PAGE DESIGNING | BASIC HARDWARE
Delhi Gate Branch 9371051769
Old ST stand Branch 9371151769
Pipeline Branch 7447761769

इंडो आयरिश हॉस्पिटल
हृदयरोग, मधुमेह, उच्चरक्तदाब, पाठदुखी, गुडघेदुखी, स्त्रीरोग, बालरोग, किडनी विकार, डायलेसीस, जनरल सर्जरी
पत्ता : तपोवन रोड, सावेडी, अहमदनगर.
फोन : 0241-2423336, मो. 9130423336.

लई भारी ! १ नंबर
भारत देशकी सर्वतम श्रेष्ठ खुशबु
परिमल भारत वासि अगरबत्ती
केवल अगरबत्ती
अहमदनगर. फोन : २३५८०७०

बजाज वॉटरप्रुफिंग कं.
जर्मन टेक्नॉलॉजी
9096291653

Back to SCHOOL
10% off For All Stationary Item
आर एन आर्ट अँण्ड क्राफ्ट
मो. ९३२५३२९०६१ / ९३७३४१७११३

SONI TILES Since 1965 AND MARBLE INDUSTRIES
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स अँण्ड मार्बल इंडस्ट्रिज
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720 Mob. 9372497999

भावपूर्ण श्रध्दांजली!



स्व.श्रीमती सुमन श्रीकृष्ण पूरकर

स्व.दि.१७ जून २०२४

समस्त पूरकर परिवार

सेवा परमो धर्म :
‘२९ जून’ दशकपूर्ती



झंवर हॉस्पिटल
जहागिरदार चाळ, भोसले आखाडा, अहमदनगर
‘फॅमिली डॉक्टर’ संकल्पनेला अधीन राहून १० बेडपासून ३० बेडपर्यंत विस्तार झाल्याबद्दल सर्व रुग्ण, कर्मचारी, सहकारी, आप्तेष्ट, मित्र व हितचिंतकांचे मनःपूर्वक आभार



डॉ.राहुल श्रीनिवास झंवर
MD, C.C.M.G. (Medical Genetics)
सौ.मीनल राहुल झंवर
(D. Pharm)
उपलब्ध सुविधा : ✲ आंतररुग्ण विभाग ✲ ईसीजी ✲ एक्स-रे ✲ रक्त/लघवी तपासणी ✲ ‘डे केअर’ सुविधा ✲ अनुवंशिक आजार तपासणी व उपचार.

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
# नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

## कामदेव व यमराज यांच्या प्रेरणा व महत्त्व

भगवान शंकर आपल्या अभिलाषेचा (काम) आणि आपोआपच मृत्युचा (यम) नाश करतो म्हणून त्याला विनाशक म्हटले जाते. कामदेव हा आयुष्याशी तर यमराज हे मृत्युशी संबंधित आहे.

आपल्या आयुष्यात या दोन्ही शक्ती फार महत्त्वाच्या. कामदेव आपल्याला आकांक्षा आणि अभिलाषांद्वारे प्रेरणा देतो. तर यमराज आपल्या जबाबदाऱ्या आणि कर्तव्यांबद्दल सतत सतर्क ठेवतो.

आपण काम का करतो हा प्रश्न स्वतःला विचारला तर ते नेहमी इच्छेपोटीच केले जात नाही हे आपल्या लक्षात येईल. बऱ्याचदा ते आपल्या जबाबदाऱ्या व कर्तव्यांमुळे केले जाते. आपल्याला हवे म्हणून नव्हे तर करायलाच हवे म्हणून आपण काम करतो.

वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षर धन
संकलन : "मुसाफिर"-९८२२०२०६९१

जेव्हा कामदेवांच्या बाणांनी घायाळ होतो तेव्हा आपल्या मनात एक उर्मी असते. यमाच्या पाशात अशी काही उर्मी नसते. काम हे एक ओझे आहे. जे आपल्याला सहन करावेच लागते. कामभावनेमुळे आपल्या मनात लालसा, तळमळ, अभिलाषा, आस निर्माण होते. ही एक प्रकारची कर्जेच आहेत. त्यामुळे आपल्याला मोठे व्हावे, श्रीमंत व्हावे अशी अभिलाषा येते. याउलट यमाच्या संदर्भीय गोष्टी कराव्याच लागतात. तो कर्जाचा हिशोब ठेवतो व ही सर्व फिटेपर्यंत पुन्हा पुन्हा जन्म घ्यायची सक्ती करतो. या सर्व हिंदू संस्कृतीतील महत्त्वाच्या संकल्पना आहेत. जरूर अभ्यासा.





# नगर मनपामध्ये आयुक्त पदाचा पदभार जिल्हाधिकारी यांच्याकडे देण्यात यावा

### उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेचे शहरप्रमुख संभाजी कदम यांची नगरविकास मंत्र्यांकडे मागणी



नगर - अहमदनगर शहराच्या इतिहासात २७ जून हा काळिमा फासणारा दिवस ठरला आहे. याच दिवशी महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. पंकज जावळे यांना रुपये ९ लाख रुपये लाच घेतानाचे पुरावे मिळाल्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने कार्यवाही केली आहे. तसेच या घटनेमध्ये कोण-कोण सहभागी आहे त्याच्या तळाशी जाऊन त्यांच्यावर कार्यवाही करण्याची गरजेचे आहे. पोलिस अधिकारी यांनी आयुक्त यांना फरार घोषित केल्यानंतर त्यांचा पदभार महानगरपालिकेतील दुसरे कोणत्याही कनिष्ठ अधिकारी यांच्याकडे न देता, तो सरळ जिल्हाधिकारी यांच्याकडे देण्यात यावा. तसेच आयुक्त जावळे यापूर्वी देखील नगरमध्ये उपायुक्त असताना त्यांना पुन्हा नगरमध्येच आयुक्तपदाचा कसा पदभार दिला जातो याची देखील चोकशी होणे गरजेचे आहे, अशी मागणी नगर विकास मंत्री यांच्याकडे उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेचे शहरप्रमुख संभाजी कदम यांनी केली आहे

# आमदार संग्राम जगताप व आयुक्त डॉ.पंकज जावळे यांच्या घोटाळ्याच्या चौकशीची दिलीप सातपुते यांनी केली मागणी

नगर - अहमदनगर महानगरपालिकेमध्ये मोठ्या प्रमाणामध्ये घोटाळे झालेले आहेत. या घोटाळ्याला जबाबदार महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. पंकज जावळे व नगर शहराचे आ. संग्राम जगताप हे आहेत. त्यामुळे या सर्व घोटाळ्यांची एकत्रितपणे चौकशी करावी, अशी मागणी शिंदे गट शिवसेना शहर प्रमुख दिलीप सातपुते यांनी केले आहे.







महानगरपालिकेचे आयुक्त यांच्यावर गुन्हा दाखल झाल्यानंतर या संदर्भामध्ये दिलीप सातपुते यांनी प्रसारमाध्यमांच्या समवेत भूमिका मांडली. यामध्ये त्यांनी नगर महानगरपालिकेमध्ये मोठे घोटाळे झालेले आहेत. पंकज जावळे यांची कारकीर्दही या अगोदर सुद्धा गाजलेली आहे. सोलापूरमध्ये सुद्धा मोठ्या प्रमाणावर आरोप त्यांच्यावर झालेले आहेत. या व्यक्तीला नगरमध्ये आणण्यासाठी आ. संग्राम जगताप यांनी पुढाकार घेतलेला होता, असा आरोप दिलीप सातपुते यांनी केला.

त्यांच्या माध्यमातूनच त्यांनी महानगरपालिकेमध्ये मोठ्या प्रमाणामध्ये घोटाळे घालण्यास सुरुवात केली होती. आयुक्त यांना हाताशी धरून आ. संग्राम जगताप यांनी अनेक ठिकाणी जागा लाटली आहे. वक्फ बोर्डाला सुद्धा यांनी फसवले आहे. त्यामुळे नगर शहरांमध्ये आ. संग्राम जगताप यांनी जे काही घोटाळे केलेले आहेत या सर्व प्रकरणाची चौकशी केली पाहिजे यासाठी सरकारकडे मागणी सुद्धा करणार असल्याचे सातपुते म्हणाले.

# शहरातील स्वच्छतागृहांची स्वच्छता करून संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करा अन्यथा नागरिकांसह मनपामध्ये आंदोलन करणार

नगर - सार्वजनिक स्वच्छतागृह स्वच्छ करण्याबाबत व संबंधित ठेकेदारांवर कारवाई करण्याबाबत मनपाने ठोस पावले उचलावीत अन्यथा मनसे नागरिकांसह मनपामध्ये मोठे आंदोलन करणार, असा इशारा मनसेचे शहर प्रमुख गजेंद्र राशीनकर यांनी दिला आहे. मनसेच्या वतीने याबाबत मनपा उपायुक्त यांना निवेदन देण्यात आले यावेळी जिल्हाध्यक्ष सचिन डफळ, शहर सचिव डॉ. संतोष साळवे, (शहर उपाध्यक्ष) संकेत व्यवहारे, तुषार हिरवे आदी उपस्थित होते.



सार्वजनिक स्वच्छतागृह स्वच्छ करण्याबाबत व संबंधित ठेकेदारांवर कारवाई करण्याबाबत मनपाने ठोस पावले उचलावीत अन्यथा मनसे नागरिकांसह मनपामध्ये मोठे आंदोलन करणार अशा इशाऱ्याचे निवेदन मनसेच्या वतीने मनपा उपायुक्त यांना देताना शहर प्रमुख गजेंद्र राशीनकर. समवेत सचिन डफळ, डॉ. संतोष साळवे, संकेत व्यवहारे, तुषार हिरवे आदी.

यावेळी बोलताना गजेंद्र राशीनकर म्हणाले कि ३१/१/२०२४ रोजी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेकडून शहरातील सार्वजनिक स्वच्छतागृह स्वच्छ करण्याबाबत व संबंधित ठेकेदारांवर कारवाई करण्याबाबतचे निवेदन दिले होते. तरी आज पर्यंत सदर निवेदनाची कुठल्याही प्रकारची दाखल घेतली नाही. ७/२/२०२४ रोजी घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख अहमदनगर महापालिका यांनी १० दिवसाची मुदत कारवाई करण्यासाठी मागितली होती, तसेच आमच्या वतीने करण्यात येणारे उपोषण स्थगित करण्याची विनंती केली होती त्यामुळे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने उपोषण करण्यात आले नाही. नागरिकांना स्वच्छतागृहाची गैर सोय होत आहे तरी याबाबत लवकरात लवकर कारवाई करावी.

सार्वजनिक स्वच्छतागृहे ही २४ तास चालू असावी संबंधित सर्व ठेकेदार यांच्यावर कारवाई करण्यात यावी. महिलांना स्वच्छतागृहाचा वापर हा मोफत असून देखील त्याच्याकडून पैसे घेतले जात आहे ते मोफत करुन द्यावे स्वच्छतागृहात २४ तास पाणी उपलब्ध करावे.

स्वच्छतागृहातील फुटलेले पाण्याचे पाईप व बंद पडलेले बेसिन हे पूर्ववत वापरण्यायोग्य करावे रात्रीच्या वेळी लाईटचे बल्ब चालू करावेत. या मागण्यांवर ८ दिवसामध्ये कारवाई करावी तसे न झाल्यास महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने महानगरपालिकेच्या आवारात तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्यात येईल.



नगरमधील कायनेटिक चौकात हिंदू समाज व शिवप्रेमींच्या वतीने पुणे हडपसर येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या मूर्तीच्या विटंबनाच्या निषेधार्थ रास्ता रोको करण्यात आला.

# अहिल्यानगर येथे रास्ता रोको आंदोलन

नगर - महाराष्ट्राचे अराध्यदैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्यासह अन्य महापुरुष व राष्ट्रीय प्रतीके यांच्या सन्मानासाठी सकल हिंदू समाजाच्यावतीने पुण्यासह पश्चिम महाराष्ट्रात २८ जून रोजी ठिकठिकाणी रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. अहिल्यानगर या ठिकाणी कार्यकर्त्यांनी रास्ता रोखून धरल्याने वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या.

महापुरुषांचा वारंवार होणारा अपमान, काही दिवसांपूर्वी हडपसरमध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मारकावर झालेली दगडफेक या घटना सामाजिक बंधुतेला काळिमा फासणाऱ्या व सकल हिंदूंचा अपमान करणाऱ्या आहेत. याचा निषेध करण्यासाठी आणि सामाजिक शांतता व सुरक्षा धोक्यात आणणाऱ्या गुन्हेगारांना दहा वर्षे सक्तमजुरीची शिक्षा देणारा कायदा पारित करावा, या मागणीसाठी हे रास्ता रोको आंदोलन करण्यात आल्याची भावना सकल हिंदू समाजाच्या कार्यकर्त्यांनी केली. कायनेटिक चौक येथील येथील आंदोलनात कार्यकर्ते सहभागी झाले.

## सुशिलाबाई आगरकर यांचे अल्प आजाराने निधन



नगर - येथील स्टेशन रोड वरील आगरकर मळा येथे राहणाऱ्या श्रीमती सुशिलाबाई रंगनाथ आगरकर (वय ८४) यांचे २७ जून रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे दिलीप, मुकुंद, सुनील व अनिल आगरकर ही ४ मुले, शैला राऊत ही मुलगी, सुना, नातवडे, जावई असा परिवार आहे.

## सुमनबाई पूरकर यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर - येथील बोरुडे मळ्यात राहणाऱ्या श्रीमती सुमन श्रीकृष्ण पूरकर यांचे १७ जून रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले.

अत्यंत कष्टाने त्यांनी आपल्या मुलांचे संगोपन केले. मनमिळावू व प्रेमळ म्हणून त्या सर्वांना परिचित होत्या.

नगर येथील रेल्वे आरक्षण अधिकारी अनिरुद्ध पूरकर यांच्या त्या मातोश्री होत. त्यांच्या पश्चात २ मुले, २ मुली, नातवंडे असा परिवार आहे.

## वसंतराव ठोंबरे यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर - चिचोंडी पाटील (ता.नगर) येथील रहिवासी वसंतराव भाऊराव ठोंबरे (वय ८५) यांचे २८ जून रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर चिचोंडी गावातील अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे हरिभाऊ, लक्ष्मीकांत व संजय ठोंबरे ही ३ मुले, १ मुलगी, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

## उजिनाथ लष्कर यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर - चिखली (ता. श्रीगोंदा) येथील रहिवासी उजिनाथ भिमाजी लष्कर (वय ८१) यांचे नुकतेच वृद्धापकाळाने निधन झाले. ते अत्यंत शांत व मनमिळाऊ स्वभावाचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुली, एक मुलगा, जावई,सूना, नातवंडे असा परिवार आहे.

देहरे येथील नवभारत विद्यालयातील शिक्षक अशोक लष्कर यांचे ते वडील होत. त्यांचा अंत्यविधी चिखली अमरधाम येथे करण्यात आला.

# राज्यातील महिलांना मिळणार दरमहा १५०० रुपये

*(पान १ वरुन)*

१५६१ कोटी ६४ लाख रुपये किमतीच्या ७६७ उपप्रकल्पांना मंजुरी देण्यात आलीय. त्याचा लाभ सुमारे ९ लाख शेतकऱ्यांना होणार आहे. विदर्भ आणि मराठवाड्यातील १४ विपत्तीग्रस्त जिल्ह्यातील केशरी शिधापत्रिका धारक शेतकऱ्यांना अन्नधान्याऐवजी दरमहा रोख रक्कम देण्यात येणार आहे.

महिला लघुउद्योजिकांनी १५ लाख रुपयांपर्यंत घेतलेल्या कर्जावरील व्याजाचा परतावा शासनाकडून करण्यासाठी आई योजना सुरू करण्यात आली आहे. महिला व बालकांविरोधातील अत्याचाराचे खटले चालवण्यासाठी १०० विशेष जलदगती न्यायालयांना आवश्यक निधी उपलब्ध करून दिला जाईल.

राज्यातील ४४ लाख ६ हजार शेतकऱ्यांच्या ७.५ अश्वशक्ती क्षमतेपर्यंतच्या शेतीपंपांना पूर्णत: मोफत वीज पुरवली जाणार- १४ हजार ७६१ कोटी रुपये अनुदान देण्यात येणार

**पेट्रोल आणि डिझेलचे दर कमी होणार, सरकारची घोषणा**

पेट्रोल व डिझेलवरील मुल्यवर्धित कर राज्यभरात समान करण्याच्यादृष्टीने बृहन्मुंबई, ठाणे व नवी मुंबई या महानगरपालिका क्षेत्रातील डिझेलवरील सध्याचा कर २४ टक्क्यांवरुन २१ टक्के प्रस्तावित करण्यात आला आहे. तसेच पेट्रोलचा सध्याचा कर २६ टक्के अधिक प्रति लिटर पाच रुपये बारा पैसे वरुन २५ टक्के अधिक प्रति लिटर पाच रुपये बारा पैसे करण्याचे प्रस्तावित केले आहे. यामुळे सर्वसामान्य नागरिक तसेच उद्योग व व्यापार क्षेत्राला दिलासा मिळणार आहे. या बदलामुळे ठाणे, बृहन्मुंबई आणि नवी मुंबई या महानगरपालिका क्षेत्रातील पेट्रोलचा दर अंदाजे पासष्ट पैसे व डिझेलचा दर अंदाजे दोन रुपये सात पैसे प्रति लिटर स्वस्त होणार आहे. पेट्रोल आणि डिझेलचे दर कमी होणार, सरकारची घोषणा

**महिलांना पोषण आहार, रोजगार आणि कौशल्यासाठीच्या योजना**

महिलांना केंद्रस्थानी ठेवून आपण प्रगतीची वाटचाल सुरू केली आहे. महिला धोरण आपण जाहीर करण्यात आली होती. त्यात वेळोवेळी बदल केले गेले. नुकतेच अष्टसुत्री महिला धोरण जाहीर करण्यात आली आहे. महिलांना पोषण आहार, रोजगार आणि कौशल्यासाठीच्या योजना राबवणार आहोत. लेक लाडकी योजना, जननी सुरक्षा योजना, प्रधानमंत्री मातृयोजना आपण आणल्या आहेत, असं अजित पवार यांनी सांगितलं.

शुभमंगल सामूहिक विवाह योजनेतील अनुदान १० हजार होते ते आता २५ हजार करण्यात आलं आहे. स्तन गर्भाशय कर्करोगाच्या निदानासाठी आरोग्य केंद्रात ७८ हजार कोटी उपलब्ध करून देणार आहोत.

- अटल बांबू समृद्धी योजनेसाठी शेतकऱ्यांना मिळणार अनुदान
- दहा हजार हेक्टरवर बांबूंची लागवड करण्यासाठी १७५ रुपये प्रति रोपट्यासाठी शेतकऱ्यांना देण्यात येणार आहे
- गायीच्या दूध उत्पादकांना प्रति लीटर पाच रुपयांचे अनुदान देण्यात येणार.
- सोयाबीन आणि कापूस उत्पादक शेतकऱ्यांना दोन हेक्टरीप्रमाणे ५ हजार रुपयांची मदत करण्यात येईल.
- आधी असलेल्या गोदामाची आधी दुरुस्ती करण्यात येईल त्यांनतर आणखी गोदाम वाढवण्यात येतील
- महिला आणि बाल गुन्ह्याचे खटले त्वरित चालवण्यासाठी शंभर विशेष न्यायालयाची स्थापना करण्यात येणार
- सातारा जिल्ह्यातील पश्चिम घाट परिसरातील पर्यटनस्थळांच्या विकासासाठी ३८१ कोटी ५६ लाख रुपये किमतीचा एकात्मिक पर्यटन विकास आराखडा मंजूर
- कल्याण-नगर मार्गावरील माळशेज घाटात सर्व सोयींनीयुक्त अत्याधुनिक व्ह्युइंग गॅलरी उभारण्यात येणार
- नागपूर जिल्ह्यातील रामटेक विकास आराखड्याच्या दुसऱ्या टप्यात २११ कोटी रुपये किमतीची कामे हाती घेण्यात येणार
- अध्यात्मिक गुरु तथा समाजसुधारक बाबा जुमदेवजी यांचे स्मारकासाठी पावडदौना, तालुका मौदा, जिल्हा नागपूर येथे ७७ कोटी रुपये किंमतीचा विकास आराखडा तयार करणार
- स्वामी विवेकानंद आंतरराष्ट्रीय प्रबोधिनी गोवंडीत कार्यरत
- राज्यात एक लाख लोकसंख्ये मागे ८४ डॉक्टर आहे, तो आता १०० करणार
- ४३० खाटांचे संलग्न रुग्णालय करण्याची मंजुरी
- रायगडमध्ये १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे युनानी महाविद्यालय स्थापन करणार
- जल युक्त शिवार अभियान २ राबवले जाणार
- गिरणी कामगारांना घरं उपलब्ध करून देणार
- मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना राबवणार
- प्रती रोपाकरता १७५ रुपये अनुदान देणार
- पोलीस पाटीलच्या मानधनात भरीव वाढ
- कांदा तेल बियाणे याकरता फिरता निधी
- नाबार्डकडून १५ हजार कोटीचे कर्ज मंजूर
- ऊस तोड मजुरांच्या मुलांसाठी आश्रम शाळा
- सिंधुदुर्गात स्कूबा डायव्हिंग केंद्र
- दिव्यांगांसाठी आनंद दिघे घरकूल योजना राबवणार
- AI संशोधनासाठी १०० कोटींचा निधी
- राज्यात ३४७ ठिकाणी बाळासाहेब दवाखाना उपलब्ध
- विधवा, दिव्यांग, वृद्धांना दीड हजार अनुदान मिळणार
- आशा वर्कर, कोतवाल, पोलिस पाटील, अंगणवाडी सेविका यांच्या वेतनाच भरीव वाढ
- एक रुपयात पीकविमा योजना सुरू राहणार
- राज्यातील ४० तालुक्यातील १ हजार २३ महसुली मंडळात दुष्काळ जाहीर
- महिलांना मुद्रांक शुल्कात सवलत

# नगरच्या बायपास रस्त्यावर अपघातांची मालिका थांबेना

### पुन्हा दोन मालट्रक समोरासमोर धडकल्या; आठवडाभरात तिसरा भीषण अपघात

नगर - नगर शहराच्या बाहेरील बायपास रस्त्यावर अपघातांची मालिका सुरूच असून निंबळक शिवारात पुलावर रात्रीच्या वेळी २ मालट्रकची समोरासमोर धडक होवून एकाचा जागीच मृत्यू झाल्याची घटना बुधवारी (दि.२६) पहाटे ३ च्या सुमारास घडली. गेल्या आठवडाभरातील हा तिसरा अपघात आहे.

हिरा राम (वय १९, रा. बाड्नेर, राजस्थान) असे या अपघातातील मयताचे नाव आहे. बायपास रस्त्यावर निंबळक शिवारात पुलावर २ मालट्रकची समोरासमोर धडक झाली. त्यातील एका ट्रकमध्ये क्लिनर असलेला हिरा राम हा जागीच ठार झाला. तर दोन्ही ट्रकचे चालक गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरु आहेत. या प्रकरणी एमआयडीसी पोलिस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. पुढील तपास पो. ना. संदीप पितळे हे करत आहेत.

बायपास रस्त्यावर गेल्या ६ दिवसांतील हा तिसरा अपघात आहे. मागील शनिवारी (दि.२२) सकाळी ७.३० च्या सुमारास अरणगाव ते वाळूंज बायपास रस्त्यावर मालट्रक व कंटेनरची समोरासमोर धडक होवून दोन्ही वाहनांच्या चालकांचा जागीच मृत्यू झाला होता. त्यानंतर सोमवारी (दि.२४) पहाटे २.३० च्या सुमारास नेप्ती कांदा मार्केट च्या पुढे नेप्ती शिवारात रस्त्यावरच उभ्या करण्यात आलेल्या कंटेनरवर भरधाव वेगातील आयशर टेम्पो धडकून टेम्पो चालक जागीच ठार झाला होता. तर बुधवारी (दि.२६) पहाटे निंबळक शिवारात पुलावर २ मालट्रकची समोरासमोर धडक झाली. या ३ अपघातात चौघांचा बळी गेला आहे.

### आंदोलनानंतरही सुरक्षेच्या उपाययोजना नाहीतच

बायपास रस्त्याचे काम अद्याप अपूर्ण असून या रस्त्यावर कुठे चारपदरी तर कुठे २ पदरी वाहतूक सुरु आहे. याबाबत कुठलेही माहिती फलक अथवा वाहतूक सुरक्षेच्या उपाययोजना राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण व ठेकेदार संस्थेने केलेल्या नसल्याने या बायपास रस्त्यावर सातत्याने अपघात होत आहेत. १५ दिवसांपूर्वीही अशाच प्रकारे २ वाहने एकमेकांना धडकून भीषण अपघात झाला होता.

त्यावेळी शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख संदेश कार्ले यांच्या नेतृत्वाखाली रास्तारोको आंदोलन करण्यात आले होते. साईड पट्या, सर्व्हिस रोड, दिशादर्शक फलक लावण्याच्या आश्वासनानंतर कार्ले यांनी आंदोलन मागे घेतले होते. परंतु राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण व ठेकेदार संस्थेने दिलेल्या आश्वासना प्रमाणे उपाययोजना केलेल्या नाहीत. त्यामुळे सातत्याने असे अपघात होत आहेत.

# नगर-दौंड रोडवर जनावरांचा टेम्पो पोलिसांनी पकडला

नगर - क्षमतेपेक्षा जास्त जनावरे दाटीवाटीने जखडून बांधून त्यांची अवैधपणे वाहतूक करणारा आयशर टेम्पो नगर तालुका पोलिसांच्या पथकाने नगर दौंड रोडवर खंडाळा गावच्या शिवारात बुधवारी (दि.२६) दुपारी ४ च्या सुमारास पकडला आहे. या टेम्पोतून १० जनावरांची सुटका करण्यात आली असून टेम्पो चालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत गोरक्षक अविनाश सतीश सरोदे (रा. वाळूंज, ता.नगर) याने नगर तालुका पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. बुधवारी (दि.२६) दुपारी नगर-दौंड रोडवर एक आयशर टेम्पोतून जनावरांची अवैध वाहतूक केली जात असल्याचे गोरक्षकांच्या निदर्शनास आले. त्यांनी नगर तालुका पोलिसांना याबाबतची माहिती दिली. पोलिसांनी आणि गोरक्षकांनी त्या आयशर टेम्पोचा पाठलाग करत खंडाळा शिवारात तो पकडला.

त्यामध्ये १० जनावरे दाटीवाटीने बांधलेली आढळली. पोलिसांनी टेम्पो चालकाला याबाबत विचारणा केली असता तो समर्पक उत्तर देवू शकला नाही. पोलिसांनी जनावरांसह टेम्पो पोलिस ठाण्यात नेला. तेथे टेम्पो चालक अर्शद शेख (रा. जेऊर, ता.नगर) याच्या विरोधात प्राण्यांना निर्दयतेने वागणूक प्रतिबंध कायदा १९६० चे कलम ११ (१) अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

# गृहिणी

## आरोग्य

### शरीराच्या योग्य पोषणासाठी

आपण निरोगी राहावं म्हणून आपण अनेक उपाय करत असतो. त्यासाठी आहारात बदल, गोळ्या औषधी घेतल्या जातात. मात्र जर तुम्ही नियमित फळांचे सेवन केलं तर हे काहीही करण्याची तुम्हाला गरज भासणार नाही. कारण फळांमध्ये ते सर्व पोषक घटक असतात जे तुमच्या निरोगी शरीरासाठी आवश्यक असतात. पपई, संत्री, किवी, पेरू या फळांमुळे तुमच्या शरीराचे योग्य पोषण होते.

## पाककला

### खवा बर्फी

**साहित्य** – खवा सव्वा कप, पिठी साखर पाव कप, वेलदोड्याची पूड एक चमचा, चारोळी किंवा बदाम किंवा काजू एक चमचा तुकडे.

**कृती** – खव्यातील गुठळ्या काढण्यासाठी तो श्रीखंडाच्या चाळणीवर गाळावा. कढई किंवा पातेल्यात मंद विस्तवावर गुलाबी परतावा. खाली उतरवून दोन–तीन मिनिटांनी त्यात पिठीसाखर व वेलदोडेपूड घालून चांगले ढवळावे. ताटात पसरून किंचित दाबाव्या, वड्या कापाव्यात. या बर्फीला साखर कमी लागून चव चांगली लागते. अशीच कोको, बदाम किंवा पिस्ता यांची बर्फी करावी, कोकोच्या बर्फीसाठी पावशेर खव्याला दोन टेबलस्पून डिंकिंग चॉकलेट, बदाम किंवा पिस्त्यासाठी दोन टेबलस्पून बदाम किंवा पिस्ताकूट आणि त्या त्या पदार्थाचा इसेन्स व रंग घालावा.

## सौंदर्य

### मुरुम नाहिसे होण्यासाठी

* आंघोळीच्या पाण्यात कोरडी मिल्क पावडर टाका. त्वचा नरम, गुलायम होईल.

* चेहऱ्यावर झालेल्या मुरूमांना वैतागलेल्या तरुण–तरुणींनी बीट–सफरचंद–पेरू व पपईचा रस दररोज प्यावा. खीरा काकडी– गाजर– कोथिंबीर यांचा रस त्याचप्रमाणे आवळा चूर्ण सेवन करावे. द्राक्ष, नासपतीचा रस, पालक–टोमॅटोचा रस घेतल्याने पित्त कमी होऊन मुरूम नाहीसे होतात.

## सल्ला

* शिजवलेल्या भाज्या फ्रिजमध्ये १५ तासापेक्षा जास्त वेळ ठेवू नयेत. त्यानंतर त्यांना बुरशी येऊ लागते.

* पोटदुखी, मुरडा इ. त्रासात ओवा व मिठासोबत हिंग सेवन करावा.

## वास्तू

घरात जेथे–जेथे वास्तुदोष असेल, तेथे–तेथे तो वास्तुदोष दूर होण्यासाठी स्वस्तिक काढावे, असा सल्ला वास्तूशास्त्राने दिला आहे.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा, नगर.**

# दैनिक पंचांग

शनिवार, दि. २९ जून २०२४

---, शके १९४६ क्रोधीनामसंवत्सर, ज्येष्ठ कृष्णपक्ष, उ.भा.०८।४९

सूर्योदय ०६ वा. २६ मि. सूर्यास्त ०६ वा. २८ मि.

**राशिभविष्य–**

**मेष** : यात्रा संभवते. रागावर नियंत्रण ठेवा. नातेवाईकांच्या भेटी होतील. महत्त्वाच्या कामांमध्ये आपणास घरच्यांचा पाठींबा मिळेल.

**वृषभ** : स्थायी संपत्ती संबंधी कामांना आज टाळा. दिवस सामान्य जाईल. कौटुंबिक जीवन आपल्यासाठी आनंद आणेल, पण खाण्या–पिण्याच्या बाबतीत काळजी घ्या.

**मिथुन** : व्यापारात कर्मचाऱ्यांवर जास्त विश्वास ठेऊ नका. सामाजिक क्षेत्रात प्रतिष्ठा वृद्धि योग. आरोग्य नरम–गरम राहील. राजकारणी व्यक्तींना उद्देशात यश मिळेल. आरोग्य नरम–गरम राहील.

**कर्क** : सामाजिक क्षेत्रात लाभ प्राप्तिचा योग. गूढ कार्यात यश प्राप्ति. अडकलेली कामे योग्य वेळी पूर्ण होतील. राहते घर व जमिनीसंबंधीच्या कामात स्थिती अनुकूल राहील.

**सिंह** : सामाजिक क्षेत्रात धार्मिक अनुसंधानाचा योग. नोकरदारांना अनुकूल वातावरण मिळेल. नवीन कामे, योजनांच्या बाबतीत स्थिती लाभदायक राहील.

**कन्या** : वाणी प्रभावामुळे लोकांना आपले मत पटवून द्याल. आपल्या मुक्कामापर्यंत पोहोचण्यासाठी कठोर परिश्रम आणि धैर्याची आवश्यकता ठेवाल.

**तूळ** : लांबच्या नातेवाईकांकडून चांगली बातमी कळू शकेल. काही प्रेमपूर्ण अनुभव आज येऊ शकतात. हा वेळ आपल्या एखाद्या आवडीच्या व्यक्तीबरोबर घालवू शकता.

**वृश्चिक** : आर्थिक स्थिति चांगली राहील. सामाजिक कामात सक्रिय भागीदारी. तब्बेत सांभाळा. आपल्या सहकाऱ्यांबरोबर झालेल्या मतभेदांचे निराकरण करण्याचा प्रयत्न करा. धावपळ जास्त होईल. देवाण–घेवाण टाळा.

**धनु** : धार्मिक कामात मन रमेल. शैक्षणिक क्षेत्रात येणाऱ्या अडचणी संयमाने सोडवा. आपल्या जुन्या लोकांना किंवा आधार देणाऱ्या मित्रांना जोडणे या वेळी आपल्यासाठी फलदायी ठरेल.


**मकर** : ज्ञान, आध्यात्माच्या उच्चस्तरीय कामात गूढ अनुसंधान योग. नवीन संबंध बनतील. सत्संग होईल. इतर लोकांना आपल्या स्वतःची गरज व इच्छा सांगण्यासाठी ही उत्तम वेळ साधाल.

**कुंभ** : कर्मकांड अध्यात्म संबंधी कामात मन रमेल. कर्जाची चिंता कमी होईल. प्रेम संबंधात यश प्राप्ति. आपल्या संपर्कात येणाऱ्या लोकांच्या वर्तनामुळे आपणास संताप येण्याची शक्यता आहे. आपण आपल्या महत्वाकांक्षा पूर्ण करू शकाल.

**मीन** : संबंधांना महत्व द्या. नवीन कार्ययोजनेचे प्रबळ योग. व्यापार व्यवसाय मध्यम राहील. योग्य उद्योगात गुंतवणूक केल्यास शेवटी आर्थिक नफा मिळेल. काही नवीन संधी मिळतील.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा, नगर.**

## शब्दगंध क्र. ६९५५ सौ.शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द :–** १) राखण करणारा; रखवालदार ४) आवडलेला; मान्य ७) भाषेतील एक अलंकार ९) भक्त किंवा सेवक यांचा समूह १०) ठावठिकाणा; माग; शोध ११) भांडण उकरून काढणे; खुसपट १३) सूट; डिस्काउंट १५) मोघम ठेवलेले १७) आवश्यकता; नड १८) लाकूड कापण्याचे हत्यार २०) सेवक; नोकर; चाकर २२) उजव्याच्या विरुद्ध; वाम २३) मुभा; मोकळीक; स्वातंत्र्य

**उभे शब्द :–** १) रागाचा आवेश ; अतिराग २) ऱ्हास; उतरती कळा; एक रोग ३) कमजोर; अशक्त ५) साथ; सोबत ६) पिकात वाढणारे अनावश्यक गवत ८) भयंकर १२) वजन असलेला; प्रतिष्ठित १३) शहाणा; ज्ञानी, समज असलेला १४) मनधरणी; आर्जव; खुशामत १५) अथवा; किंवा १६) स्त्री; बाई; महिला १९) तळलेला एक खमंग पदापदार्थ २१) एक अधिक पाव

**शब्दगंध क्र. ६९५४ चे उत्तर**

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| म | म | ता | ■ | है | द | र | ■ |
| ह | ■ | र | वि | वा | र | ■ | अ |
| ती | र | क | मा | न | ■ | स | न |
| ■ | मे | ■ | न | ■ | प्र | भा | व |
| ना | श | क | ■ | छा | ■ | ■ | था |
| व | ■ | सा | मा | न | सु | मा | न |
| ड | बा | ■ | हे | ■ | ख | त | ■ |
| ती | ळ | ■ | र | जा | ■ | गा | य |

**फिल्मीचक्कर क्र. ११४४ चे उत्तर**

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| सौ | सा | ल | प | ह | ले | मु | झे |
| ब | ■ | ग | ■ | की | ■ | नी | ■ |
| र | त | न | ■ | क | | म | ■ |
| स | न | ■ | सा | त | ■ | जी | स |
| के | ■ | स | ■ | ■ | | ■ | फ |
| जिं | द | गी | ए | क | स | फ | र |
| द | ■ | ता | ■ | बी | ■ | कि | ■ |
| गी | ता | ■ | या | र | ■ | रा | खी |

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : जे पुस्तक तुम्हाला अधिक विचार करण्यास भाग पाडते, ते पुस्तक जीवनात तुम्हाला अधिक साहाय्यभूत बनते.

## मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

### जखमेवर चुना वा हळद लावणे योग्य आहे का?

जखमेवर चुना वा हळद लावण्याची पद्धत अनेक ठिकाणी दिसून येते. खेड्यात व शहरातही, जखम झाल्यास आजही लोक हळद वा चुना लावतात. हळद वा चुना लावल्यास रक्त यायचे थांबते, हे खरे आहे; पण केवळ एवढ्याच कारणासाठी जखमेवर हळद वा चुना लावणे योग्य आहे का?

हळद ही जंतूची (जिवाणूंची) वाढ होण्यास प्रतिबंध करते. चुन्यामुळे जखमेच्या आसपासचा भाग जाळल्यासारखा, निर्जंतुक होतो. हे झाले काही फायदे; पण याचे तोटेही आहेत. हळद शुद्ध नसेल तर (म्हणजे तिखट, हिंग मिसळलेले असेल), जखमेची आग होऊन ती चिघळू शकते. इतर काही कचरा असेल तर जखमेत जंतुसंसर्ग होऊन पू होऊ शकतो. जखमेला चुना लावल्यास जखम भरून आल्यानंतर त्वचेवर विद्रूप असा व्रण येतो. आजकाल जंतुनाशनासाठी व जखम बरी करण्यासाठी अत्यंत परिणामकारक अशी औषधे उपलब्ध आहेत. रक्तस्त्राव होणारी जखम साबणाच्या पाण्याने वा सौम्य डेटॉलने स्वच्छ धुवावी. त्यावर कापसाने टिंक्चर बेन्झाईन वा आयोडीन लावावे. त्याने रक्तस्त्राव थांबेल व जखमेत जंतू असतील तर ते मरतील. जखमेत पू वगैरे झाला असेल तर दररोज ती डेटॉलने धुवावी व त्यावर निओस्पोरीनची पावडर वा सोफ्रामायसीन मलम लावावे.

शुद्ध हळद जखमेवर लावणे उपयुक्त आहे. चुन्याने मात्र त्वचेवर विद्रुप व्रण येऊ शकतो. मुख्य म्हणजे अत्यंत परिणामकारक औषधे उपलब्ध असल्याने असे उपाय न करता डेटॉल बेन्झाईन वा सोफ्रामायसीनचा वापर करावा; हेच बरे.

## बेडकीला झाला गर्व

तळ्यातल्या बेडकांची काही मुलं खेळायला म्हणून काठाजवळच्या कुरणात आली. तेथे ती लपाछपीचा खेळ खेळू लागली. तेथील कुरणात एक मोठा बैल चरत होता. खेळता– खेळता बेडकाचे एक पोर बैलाच्या पायाखाली सापडून मरण पावले. ते पाहताच बेडकाची सर्व मुले घाबरुन घरी आली.

त्यातील एका मुलाने आईला ती हकीगत सांगितली आणि म्हणाला, ''आई, आतापर्यंत आम्ही असा मोठा प्राणी कधी पाहिला नव्हता. कसा धिप्पाड शरीराचा होता, बघ तो. त्यावर त्याची आई बेडकी म्हणाली,''

मुला, खूप मोठा होताना तो? मुलगा 'हो' म्हणताच बेडकीने आपले पोट फुगवीत म्हटले,'' इतका मोठा होता का रे?'' त्यावर बेडकीने आणखी पोट फुगवून दाखविले. तेव्हा ती मुले म्हणाली,'' आई, तू कितीही पोट फुगवून दाखविलेस, तरी त्या प्राण्याच्या नखाचीसुद्धा बरोबरी तू करु शकणार नाहीस.''

तेव्हा बेडकी गर्वाने आणखी फुलू लागली असता एका क्षणी तिचे पोट फाटले आणि ती प्राणाला मुकली.

**तात्पर्य** : ज्याची बरोबरी आपण कधीही करु शकत नाही, तसा प्रयत्न केल्यावर संकट ओढवून घेण्यासारखे आहे.

## जीवन चक्र



व्यवहारामध्ये एखादी व्यक्ती एखाद्या अशा वस्तूची इच्छा करतो की जी भौतिक नाही. ती व्यक्ती दुसऱ्यांवर आपला प्रभाव पाडण्याची इच्छा करते. हा सुध्दा एक विश्वासघातकी मार्ग आहे. बऱ्याच वेळा ती व्यक्ती जे हवे आहे ते इतरांकडून करून घेण्यासाठी, काही प्रसंगी लोकांना धोका देते. त्यांच्याशी खोटे बोलावे लागते, त्यांची उपेक्षा करावी लागते आणि त्याकरीता मोठ्या चलाखीने त्यांना प्रभावित करावे लागते. असे केल्याने काही समजदार लोक त्याला ओळखतील आणि याची प्रतिक्रीया स्वरूप ते त्याच्या पासून वाचतील किंवा ते त्यास बदनाम करू शकतील वा ते त्याच्यावर वार देखील करू शकतात. अशा व्यक्तींच्या संकटांना कधीच अंत नसतो. कारण ती व्यक्ति प्रत्येकाला आणि प्रत्येक वस्तुला आपल्या अधिपत्याखाली, नियंत्रणाखाली ठेवण्याचा प्रयत्न करते. आम्हांला प्रसिद्धीची इच्छा होते तेव्हा आम्ही आम्हांला भेटणाऱ्या प्रत्येकास वाढवून, चढवून व मोठ्याने सर्व सांगत असतो त्यामुळे आमचा अहंकार वाढतो. पहा कसे काही लोक खोट बोलून, धोका देवून, खोटे आश्वासन देवून लोकांना स्वतःकडे आकर्षित करतात. नट–नट्यांना स्वतःविषयीच्या बदनामीच्या बातम्यांना खपवून घ्यावे लागते. कारण त्यामुळे त्यांना प्रसिद्धी मिळते. जी प्रसिद्धी ते इच्छितात खरे तर ती अपयशाने मिळालेली प्रसिद्धी असते.

मनातील इच्छांचा आणि त्याद्वारे निर्माण होणाऱ्या दुःखांचा कुठलाही अंत नाही. एकदा का आम्ही इच्छेच्या मार्गाने चालू लागलो की आम्ही गोष्टीतील श्रीमंत मनुष्यासारखे होतो. आम्ही विचार करू लागतो की आम्ही शांती आणि समाधानाच्या सुरक्षित स्थानाला सोडून कठिण रस्त्याची निवड का केली? शेवटी आम्ही शांती आणि समाधान जे इच्छेमुळे आमच्यापासून दूर झाले ती मिळविण्याकरीता आम्ही आतूर होतो.

आम्हांला जर शांती आणि आनंद हवा आहे तर मनाच्या इच्छेपुढे आम्ही आमचे गुडघे टेकवू नये. त्याऐवजी आम्ही जो आत्म्याच्या अंतरंगात आपल्या असणाऱ्या समाधानाचे स्वागत करावे.

आम्ही जेव्हा ध्यान करतो तेव्हा कायम निर्माण होणाऱ्या इच्छांना आमच्या अंतरी येऊ न देता त्याजागी आमच्या आत्म्याच्या बागेत शांती आणि समाधानाने बसावे. अर्थात त्या सर्व दुःखा पासून दूर जे इच्छा आपल्या सोबत आणते.

**(कृपाल आश्रम, अहमदनगर)**

## शुद्ध जीवन जीने के मंत्र

उस समय मैंने लगातार सकाश दिया। जब धरती सूख गई तब बड़ा आश्चर्य हुआ। बाढ़ के कारण मेरे आस–पास के खेतों की फसल पूरी तरह से नष्ट हो गई थी लेकिन फिर भी मेरे खेत में चार बोरी मूंगफली निकली। मेरी खुशी का पारावार नहीं रहा। मैंने एक बोरी ब्रह्माकुमारी सेवाकेन्द्र पर भगवान को अर्पित की। सारा गाँव उस फसल को देखने आया और कहने लगे कि ऐसा कैसे हो सकता है! तो यह है शुद्ध संकल्पों का कमाल जिसका परमात्मा रक्षक हो उसका बाल बांका नहीं हो सकता है।

ब्र.कु. उज्वला संभाजी पाटील

मु.पो. मोरले, ता. शिरोल, जि. कोल्हापुर

मेरी १५ गुंठा खेती है। सन २०११ में मैंने अपने खेत में मूंगफली बोई थी। मैंने फसल लगाते वक्त परमात्मा को याद कर बीज बोया था। भाव यह था कि यह खेती परमात्मा की है और मूंगफली के दाने परमात्म शक्ति से भरे हुए हैं। मेरी यह खेती की भूमि नदी किनारे है तो ज्यादा बरसात आने पर वहाँ बाढ़ आ जाती है लेकिन फिर भी परमात्मा पर पूरा निश्चय रखकर विश्वास के साथ यह मूंगफली की फसल उगाई गई थी।

मैं दिन में दो बार और अमृतवेले १५ मिनट अपनी फसल को सकाश देती थी। मैं संकल्प करती थी कि मेरे खेत में मूंगफली की फसल बहुत अच्छी हो रही है... यही दृश्य मेडिटेशन में हमेशा देखती रहती थी। फसल बहुत अच्छी थी। मैं पिछले ४ साल से राजयोग का अभ्यास कर रही हूँ। सन २०११ में बरसात के दिनों में बाढ़ में पूरा खेत डूब गया। १५ दिन तक बाढ़ का पानी खेत में रहा, फसल उसमें डूबी रही। ऐसे समय में भी मेरा परमात्मा पर पूरा निश्चय था कि यह फसल ईश्वर की है। उसकी शक्तियों का कवच खेत पर है। मुझे बिल्कुल संशय नहीं आया, भाव ये था कि परमात्मा रक्षक हैं इसलिए इस खेती को कुछ नहीं होगा, ऐसा मन में दृढ़ विश्वास था। उस समय मैंने लगातार सकाश दिया। जब धरती सूख गई तब बड़ा आश्चर्य हुआ। बाढ़ के कारण मेरे आस–पास के खेतों की फसल पूरी तरह से नष्ट हो गई थी लेकिन फिर भी मेरे खेत में चार बोरी मूंगफली निकली। मेरी खुशी का पारावार नहीं रहा। मैंने एक बोरी ब्रह्माकुमारी सेवाकेन्द्र पर भगवान को अर्पित की। सारा गाँव उस फसल को देखने आया और कहने लगे कि ऐसा कैसे हो सकता है! तो यह है शुद्ध संकल्पों का कमाल जिसका परमात्मा रक्षक हो उसका बाल बांका नहीं हो सकता है।

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**


## हसा आणि शतायुषी व्हा!

एका लहान मुलाने त्याच्या बाबांना
विचारले,
बाबा सांगा ना ....माझा जन्म कसा
झाला?
त्याचे बाबा म्हणतात अरे कार्ट्या तुला
किती वेळा सांगितलाय..
तुझा रीतसर जन्म झालेला आहे..
आम्ही तुला कोणत्याही वेबसाईट वरून
फुकटात डाऊनलोड नाही केले....

## रविंद्रनाथ टागोरांच्या कविता

(मूळ इंग्रजीत)

सागर त्याचे ढोल मजेत बडवतोय
फूल तुझे चुंबन घेण्यासाठी
मुलांपासून धडपडतेय
स्वर्ग तुझ्यात अवतरलाय वत्स
तसेच धरणी मातेच्या
बाहुतही उतरलाय



**मूळ इंग्रजी कविता – रविंद्रनाथ टागोर**
**मराठी अनुवाद – अरविंद ब्राम्हणे,**
भिंगार मो. ९४०३७३४२८१

## स्त्री स्वास्थ्याचे कानमंत्र आरोग्य सखी

**गर्भाशयमुख कर्करोग लसीकरण** – याचा कर्करोग होऊ नये म्हणून सध्या भारतात लस उपलब्ध झाली आहे. ही लस वयाच्या नवव्या वर्षापासून ते तेराव्या वर्षापर्यंत देतात. एचपीव्ही व्हायरसची लागण होऊ नये म्हणून ही लस लैंगिक संबंध सुरू होण्यापूर्वीच मुलामुलींना देतात. त्यामुळे साधारणतः कर्करोग होण्याची शक्यता ९०%नी कमी होते. जर लहान वयात लस घेता आली नाही, तर वयाच्या ४५ वर्षांपर्यंत केव्हाही ही लस घेता येते. परंतु या वयात लैंगिक संबंध होत असल्याने त्याचा प्रभाव कमी असू शकतो. याबाबतची संपूर्ण माहिती आपल्या स्त्रीरोगतज्ज्ञांकडून घेऊन वेळीच लसीकरण करून घ्या.

**कर्करोगाच्या अवस्था – १) प्राथमिक अवस्था** : या अवस्थेमध्ये जननेंद्रियाच्या ज्या अवयवाला कर्करोगाची लागण होते तिथेच बाधा पसरलेली असते. आजूबाजूच्या अवयवांमध्ये त्याचा प्रसार झालेला नसतो. त्यामुळे वेळीच त्या अवयवापुरती शस्त्रक्रिया केली की स्त्री–रुग्ण पूर्णपणे बरी होते.

**२) द्वितीय अवस्था** : या अवस्थेमध्ये कर्करोग उदर पोकळीतील आजूबाजूच्या अवयवांपर्यत पसरलेला असतो. परंतु खोलवर अस्थीपर्यंत पोहोचलेला नसतो. या अवस्थेमध्ये अवयवांच्या शस्त्रक्रियेबरोबरच आजूबाजूच्या लसिका ग्रंथीदेखील काढून टाकाव्या लागतात. तसेच यासोबत केमोथेरपी करून स्त्रीचे आयुष्य वाढवता येते.

**३) तृतीय अवस्था** : या अवस्थेमध्ये कर्करोग शरीरातील सर्व अस्थीपर्यंत पसरलेला असतो. तसेच लसिका ग्रंथीमार्फत तो संपूर्ण शरीरात पसरलेला असतो. शरीरातील सर्व अवयवांना याची लागण झालेली असते. या अवस्थेतील रुग्णांना केमोथेरपी करून उरलेले आयुष्य कमी त्रासात थोडेफार वाढवता येते. परंतु या अवस्थेमध्ये उपचाराचा फारसा लाभ झालेला दिसत नाही. डॉक्टर जननेंद्रियाच्या कर्करोगांवरील उपचार त्याच्या अवस्थेनुसार ठरवतात. केमोथेरपीद्वारे कर्करोगाच्या पेशींचा नाश केला जातो. परंतु केमोथेरपीच्या फायद्यांबरोबर तोटेही सहन करावे लागतात. कारण कर्करोगाच्या पेशींबरोबरच शरीराला आवश्यक असणाऱ्या निरोगी पेशींचाही नाश होतो. त्यामुळे केमोथेरपीचा वापर केल्यावर बऱ्याच स्त्रियांमध्ये रक्ताचे प्रमाण कमी होते. त्याचबरोबर अंगावरील, डोक्यावरील केस कमी होतात. त्वचेचा रंग काळा पडतो. अशक्तपणा येतो. हे दुष्परिणाम टाळण्यासाठी प्राथमिक अवस्थेतच किंवा त्यापेक्षाही पूर्वी आजाराचे निदान होण्यासाठी चाळिशीनंतर वर्षातून एकदा स्त्रियांनी संपूर्ण शरीराची तपासणी करून घ्यावी. (क्रमशः)

**डॉ. शारदा निर्मळ–महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहमदनगर मोबाईल नं– ८७९३४००४००

# मनुष्याला सुसंस्कृत बनविण्याकरिता ‘पुस्तके’ भावी पिढीत विचार रुजवतात

## रामचंद्र दरे यांचे प्रतिपादन; शाळा व महाविद्यालयाच्या ग्रंथालयास शाहू महाराजांच्या चरित्रावर पुस्तकांची भेट

नगर – शाहू महाराज लोककल्याणकारी राजे होते. बहुजनांना शिक्षण जातीभेद निर्मूलन, नोकऱ्यांमध्ये आरक्षण आणि स्त्रीमुक्ती कायदे करणारे सुधारणावादी समाजसुधारक होते. शिक्षणाद्वारे जातीभेद निर्मूलन होण्यासाठी त्यांनी कार्य केले. मनुष्याला सुसंस्कृत बनविण्याकरिता पुस्तके भावी पिढीत विचार रुजवतात, बहुजन समाजाला दिशा देणारे शाहू महाराजांचे विचार व कार्य नवीन पिढीपर्यंत पोहोचवण्यासाठी संस्थेचे कर्मचारी संतोष कानडे यांनी राबविलेला हा उपक्रम आदर्शवत असल्याचे संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र दरे यांनी सांगितले.



राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या चरित्रावर आधारित जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाच्या शाळा व महाविद्यालयाच्या ग्रंथालयास पुस्तके भेटीचा स्वीकार करताना अध्यक्ष रामचंद्र दरे. समवेत संस्थेचे इतर पदाधिकारी.

राजर्षी शाहू महाराज जयंती निमित्त शाहू महाराजांच्या चरित्रावर अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेतील शाखा शाळा व महाविद्यालयाच्या ग्रंथालयास पुस्तकांची भेट देण्यात आली. न्यू आर्ट्स कॉमर्स अँण्ड सायन्स महाविद्यालयाचे प्रशासकीय कर्मचारी तथा संतोष कानडे यांनी शाहू महाराजांचे विचार भावी पिढीत रुजविण्यासाठी जयंती दिनाचा हा आगळा-वेगळा उपक्रम राबविला.

अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेतील सर्व शाळा व महाविद्यालयाच्या ग्रंथालयास शाहू महाराजांच्या चरित्रावर प्रा. नानासाहेब साळुंखे लिखित शाहूंच्या आठवणी या पुस्तकांच्या ३० प्रती विविध शाखा शाळांच्या विद्यार्थ्यांना वाचनासाठी उपलब्ध व्हाव्यात याकरिता संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र दरे यांच्याकडे सुपुर्द करण्यात आल्या.

यावेळी माजी कुलगुरू डॉ. सुधीर गव्हाणे, संस्थेचे उपाध्यक्ष डॉ. विवेक भापकर, सचिव अ‍ॅड. विश्वासराव आठरे पाटील, सहसचिव जयंत वाघ, खजिनदार दीपलक्ष्मी म्हसे, विश्वस्त मुकेश मुळे, दीपक दरे, अर्जुनराव पोकळे, अरुणाताई काळे, कल्पना वायकर, प्राचार्य डॉ. बाळासाहेब सागडे आदी उपस्थित होते.

शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांपर्यन्त शाहू महाराजांचे कार्य साहित्याच्या माध्यमातून पोहोचण्यासाठी या पुस्तकाची मदत होणार असल्याचेही मत दरे यांनी व्यक्त केले. ज्ञानाचा मुख्य स्त्रोत म्हणून पुस्तकाचे महत्त्व आजही टिकून आहे. विद्यार्थ्यांना सुसंस्कृत बनवण्यासाठी वाचनाकडे वळवण्याची गरज असून, त्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आल्याचे संतोष कानडे यांनी सांगितले.

# भारताने योग ही जगाला दिलेली एक देणगी

## पल्लवी बहादुर्गे यांचे प्रतिपादन; वाळुंज येथील नालंदा स्कूलमध्ये आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा

नगर – माणसाचे जीवन हे अस्थिर होत चाललेले आहे. धकाधकीच्या जीवनात ताण-तणावामुळे आरोग्यावर परिणाम होतो. या सर्वांवर योगासनामुळे मात करू शकतो. भारताने योग ही जगाला दिलेली एक देणगी आहे, म्हणूनच जगभरामध्ये जागतिक म्हणजेच २१ जून हा आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून साजरा केला जातो, असे प्रतिपादन विद्यालयाच्या डायरेक्टर पल्लवी बहादुर्गे यांनी केले.



वाळुंज येथील नालंदा स्कूलमध्ये आंतरराष्ट्रीय योग दिवस उत्साहात साजरा करण्यात आला यावेळी डायरेक्टर पल्लवी बहादुर्गे, विद्यालयाच्या प्राचार्या हैदर डिसूजा, योगशिक्षक सागर पवार आदींसह विद्यार्थी उपस्थित होते. (छाया – समीर मन्यार )

वाळुंज येथील नालंदा स्कूलमध्ये आंतरराष्ट्रीय योग दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी डायरेक्टर पल्लवी बहादुर्गे, विद्यालयाच्या प्राचार्या हैदर डिसूजा, योगशिक्षक सागर पवार आदींसह विद्यार्थी उपस्थित होते.

पुढे बोलताना बहादुर्गे म्हणाल्या की आंतरराष्ट्रीय योगा दिवस विविध विद्यालयात विविध ठिकाणी सर्वत्र मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. नालंदा विद्यालयामध्ये विद्यालयातील विद्यार्थ्यांबरोबरच पालकांनीही योगाचा आनंद घेतला. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण होते नालंदा मध्ये शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांच्या आरोग्याची ही काळजी घेतली जाते शरीर सुदृढ राहण्यासाठी विद्यालयामध्ये नेहमीच योगाचे धडे हे दिले जातात. राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय पातळीवर विविध खेळाच्या माध्यमातून नालंदाचे विद्यार्थी हे चमकले आहेत. शिक्षणाबरोबर खेळ ही तितकाच महत्त्वाचा आहे दोन्हीही एकाच नाण्याच्या दोन बाजू असल्यामुळे दोन्ही क्षेत्रात नालंदाचे विद्यार्थी अग्रेसर आहेत त्यामुळे विद्यालयाचा निकाल नेहमी १००% लागत असल्याचे त्या म्हणाल्या.

सागर पवार यांनी योग व योगाचे महत्त्व मुलांना सांगितले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली योगा दिवस करण्यात आला. इयत्ता पहिली ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी यामध्ये सहभाग घेतला होता.

# ‘प्रीथीज पाठशाला’ तर्फे १४ जुलैला वार्षिक इंग्रजी शब्दलेखन स्पर्धा

नगर – प्रीथीज पाठशाला, शैक्षणिक उत्कृष्टतेसाठी ओळखली जाणारी वार्षिक शब्दलेखन स्पर्धा १४ जुलै रोजी किड्‌जी, साईनगर येथे होणार आहे.

गेल्या वर्षीच्या स्पर्धेच्या यशस्वीतेनंतर, ज्यामध्ये ७०० हून अधिक सहभागी ऑनलाइन व ऑफलाइन स्पर्धेत सहभागी झाले होते, यंदाची स्पर्धा अधिक रोमांचक होणार आहे.

ही स्पर्धा एलकेजी ते सहावीच्या विद्यार्थ्यांसाठी खुली आहे. एलकेजी आणि युकेजीमधील लहान मुले १०० शब्दांच्या यादीतून तयारी करतील, तर पहिली ते सहावीतील विद्यार्थी १५० शब्दांच्या यादीतून तयारी करतील. स्पर्धेमध्ये दोन रोमांचक फेऱ्या असतील, ज्या विद्यार्थ्यांच्या शब्दलेखन कौशल्याची चाचणी घेतील आणि त्यांचा आत्मविश्वास वाढवतील.

स्पर्धेत सहभागासाठी नोंदणी शुल्क फक्त १९९ रुपये आहे. प्रत्येक सहभागीला सहभाग ट्रॉफी आणि प्रमाणपत्र दिले जाईल. विद्यार्थ्यांच्या पालकांनी ३ जुलै पूर्वी आपल्या मुलांची नोंदणी करावी. शब्दांची यादी ४ जुलै रोजी पुरवली जाईल. अधिक माहितीसाठी आणि नोंदणीसाठी कृपया प्रीथीज पाठशाला येथे ९५२७४०४७२७, ८७९३४४५५९८, किंवा ८७९३७१५३१६ या क्रमांकावर संपर्क साधावा, अशी माहिती प्रीथीज पाठशालाच्या संस्थापिका प्रीती मुथियान यांनी दिली. शब्द आणि शब्दलेखनाचा आनंद साजरा करण्यासाठी आमच्यासोबत एक दिवस घालवा!

# जो जास्त शिकेल तो तितका मोठा होणार

### बाळासाहेब बोराटे यांचे प्रतिपादन

नगर – प्रत्येकाची प्रगती ही शिक्षणावर अवलंबून असते, जो जास्त शिकेल तो तितका मोठा होणार. त्यामुळे विद्यार्थ्यांनी चांगला अभ्यास करुन कुटूंबाचे, विद्यालयाचे नाव मोठे करावे. प्रत्येक विद्यार्थ्याला शिक्षण मिळावे, यासाठी शासनस्तरावर प्रयत्न केले जात आहे. त्या माध्यमातून विविध शालेय साहित्य, आहार, पाठ्यपुस्तके मोफत दिले जाते. शाळेतील शिक्षकही आपल्याला चांगले शिक्षण देत आहेत. तेव्हा विद्यार्थ्यांनी याची जाणिव ठेवून चांगला अभ्यास करावा. प्रगत विद्यालयाच्यावतीने विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी चांगले प्रयत्न केले जात आहेत. त्यांच्या कार्यास आपले नेहमी सहकार्य राहील, असे प्रतिपादन नगरसेवक बाळासाहेब बोराटे यांनी केले.



प्रगत विद्यालयात दिव्यांग विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तकांचे वितरण नगरसेवक बाळासाहेब बोराटे यांच्या हस्ते करण्यात आले.

### प्रगत विद्यालयत दिव्यांग विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तकांचे वितरण

प्रगत माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयत दिव्यांग विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तकांचे वितरण नगरसेवक बाळासाहेब बोराटे यांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती विजयाताई रेखे, सेक्रेटरी सुनिल रुणवाल, कार्यकारणी सदस्य किरण वैकर, दिव्यांग समावेशित शिक्षणाचे मनपाचे प्रमुख उमेश शिंदे, प्राचार्य सुनील पंडित, मुख्याध्यापिका सौ.प्रतिभा धरम, विधाते शिक्षण संस्थेचे अध्यक्ष शिवाजी विधाते आदि उपस्थित होते.

यावेळी श्रीमती विजयाताई रेखे म्हणाल्या, संस्थेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना सर्व भौतिक सुविधा पुरविण्यात येत आहेत. शासनाच्या विविध योजनांचा लाभ संबंधितापर्यंत पोहचवून त्यांची प्रगती साधली जात आहे. शिक्षकांच्या सहकार्याने विद्यार्थीही अभ्यास, परिक्षा, क्रीडा, स्पर्धा परिक्षांमध्ये चांगले यश संपादन करुन विद्यालयाच्या लौकिकात भर टाकत आहेत.

यावेळी प्राचार्य सुनिल पंडित म्हणाले, विद्यार्थी हा केंद्रबिंदू मानून त्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी विशेष प्रयत्न केले जात आहे. शासनाच्यावतीने मोफत पुस्तके व इतर सेवा-सुविधांचा लाभ त्यांना मिळवून दिला जातो. आज मोफत पाठ्यपुस्तक वाटप केले आहे. विद्यार्थीही आपली प्रगती साधत असल्याचे सांगितले.

मुख्याध्यापिका सौ.प्रतिभा धरम यांनी शाळेच्या प्रगतीचा आढावा सादर केला. यावेळी संस्थेतील सर्व शिक्षक विद्यार्थी उपस्थित होते.

# वृक्षांमुळे मानवी जीवन प्रभावित

## सीईओ विक्रांत मोरे यांचे प्रतिपादन; 'स्नेहबंध'तर्फे छावणी परिषद कार्यालय परिसरात वृक्षारोपण

नगर – वृक्षवल्ली आम्हा सोयरी म्हणजे झाड आपले मित्र. हो खरच, वृक्ष नाही तर जीवन सुद्धा नाही. मानवाची सेवा करण्यात निसर्गाचा फार मोठा सहभाग आहे. वृक्ष केवळ आपलेच जीवन प्रभावित करतात असे नव्हे, ते तर आपले अस्तित्व सुरक्षित ठेवण्यासाठी संजीवनी प्रदान करतात, असे प्रतिपादन छावणी परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विक्रांत मोरे यांनी केले.



'स्नेहबंध'तर्फे छावणी परिषद कार्यालय परिसरात वृक्षारोपण करतांना मुख्य कार्यकारी अधिकारी विक्रांत मोरे, स्नेहबंधचे अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे, रमेश साके, गणेश भोर, शिशिर पाटसकर, अमोल कुलट, रोहित पाटील, बालाजी वल्लाल.

स्नेहबंध सोशल फाउंडेशनच्या वतीने छावणी परिषद कार्यालय परिसरात मुख्य कार्यकारी अधिकारी विक्रांत मोरे यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी स्नेहबंध सोशल फौंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे, वरिष्ठ स्वच्छता निरीक्षक रमेश साके, स्वच्छता निरीक्षक गणेश भोर, वरिष्ठ राजस्व लिपिक शिशिर पाटसकर, भूमी लिपिक अमोल कुलट, लिपिक रोहित पाटील, शिल्पकार बालाजी वल्लाल, निशांत पानसरे आदी उपस्थित होते.

स्नेहबंध फाउंडेशनच्यावतीने दरवर्षी विविध शासकीय कार्यालये, शाळा परिसरात वृक्षारोपण करण्यात येते. त्याचाच एक भाग म्हणून छावणी परिसर कार्यालय परिसरात वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनासाठी हातभार लावला.

### वृक्ष लागवड आणि संवर्धन करण्याचे आवाहन

वृक्ष संवर्धन ही काळाची गरज आहे. वृक्षांचा होत असलेला मृत्यू हा पृथ्वीवरील सजीव सृष्टीचा हळूवारपणे होत असलेला अंत आहे. हे ध्यानात घेऊन मानवाने वृक्षाची लागवड व संवर्धन करावे, असे आवाहन स्नेहबंधचे अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे यांनी केले.

# ऑनलाईन लेखन स्पर्धेत नगरच्या आशा भंडारी यांना प्रथम क्रमांक

नगर – पुणे चिखली येथील चैतन्य सामाजिक संस्थेच्यावतीने आयोजित ऑनलाईन लेखन स्पर्धेत नगरच्या आशा भंडारी यांना प्रथम क्रमांक मिळाला आहे. ‘बेटी बचाओ बेटी पढाओ के चक्कर में लोग बेटी बसाना भूल गये’ या विषयावर भंडारी यांनी केलेल्या लेखनाची सर्वांनी प्रशंसा करून त्यांना प्रथम क्रमांक दिला. संस्थेच्या संस्थापक अध्यक्षा अनिता नहार, कमिटी सदस्य सपना जैन, साधना सवाने, कविता भळगट, सुनिता देसर्डा यांनी भंडारी यांना सन्मानपत्र दिले आहे.



संस्थेनेच आयोजित केलेल्या ‘नावतंड अवती भोवती आजी आजोबांच्या आयुष्याची संध्याकाळ आनंददायी’ या विषयावरील लेखन स्पर्धेतही भंडारी यांना प्रथम क्रमांक मिळाला. वृध्दत्वाची सोनेरी झालर म्हणजे नातवंडे असतात. अवखळ, निरागस, निष्पाप असे हसरे तारे म्हणजे आजीआजोबांसाठी स्वर्गीय सुख असते. दुधापेक्षा दुधावरची साय गोड. नातवंडांच्या प्रेमाला जगात तोड नाही, असे विचार त्यांनी लेखनातून मांडले.

मुलींच्या विषयावर त्यांनी अतिशय उद्बोधक लेखन केले. स्त्री पुरुषांचे बिघडलेले व्यस्त प्रमाण भविष्यात अनेक समस्या निर्माण करणारे आहे. तनमनधन देवून हे थांबविणे गरजेचे आहे. मुलींना शिकवणे, वाचवणे अत्यावश्यक आहे. त्याचवेळी त्यांचा संसारही चांगला उभा केला पाहिजे. ही काळाची मोठी गरज आहे, असे विचार त्यांनी मांडले.

आशा भंडारी या सातत्यपूर्ण विविध विषयांवर प्रभावी लेखन करीत असतात. धार्मिक, सामाजिक विषयांवरील त्यांच्या लेखनास अनेक निबंध स्पर्धांमध्ये पारितोषिके मिळाली आहेत.



मनपाच्या केडगाव येथील ओंकारनगर प्राथमिक शाळेत पहिलीच्या विद्यार्थ्यांची घोडागाडीतून मिरवणूक काढण्यात आली. समवेत अरुण पालवे, मुख्याध्यापक भाऊसाहेब कबाडी आदी.

# ओंकारनगर शाळेतील विद्यार्थ्यांची घोडागाडीतून मिरवणूक

### समता दिनानिमित्त गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

नगर – अहमदनगर महानगरपालिकेच्या केडगाव येथील ओंकारनगर प्राथमिक शाळेत इयत्ता पहिलीच्या विद्यार्थ्यांची घोडागाडीतून मिरवणूक काढण्यात आली.निमित्त होते शाळा पूर्व तयारी मेळाव्याचे. यावेळी राजर्षी शाहू महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. तसेच समता दिनानिमित्त शिष्यवृत्ती परीक्षेत यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मनपा शिक्षण विभागाचे विषयतज्ञ अरुण पालवे होते. कार्यक्रमासाठी एल.आय.सीचे विकास अधिकारी तुषार देशमुख, सुवर्णराज ट्रेडर्सचे सुयश कटारिया, केंद्र समन्वयक चंद्रशेखर साठे, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्षा प्रियंका लोळगे, उपाध्यक्षा दिपाली साळवे, मुख्याध्यापक भाऊसाहेब कबाडी, सहशिक्षक शिवराज वाघमारे, सहशिक्षिका वृषाली गावडे, पल्लवी भुजबळ, दुर्गा घेवारे, कवित वाघमारे यांची उपस्थिती होती.

प्रारंभी इयत्ता पहिलीमध्ये दाखल झालेल्या विद्यार्थ्यांची घोडागाडीतून केडगाव परिसरातून मिरवणूक काढण्यात आली. त्यानंतर शिष्यवृत्ती व विविध स्पर्धा परीक्षेत उज्वल यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा शैक्षणिक साहित्य देऊन सत्कार करण्यात आला. शाळा पूर्व तयारी मेळाव्यामध्ये इयत्ता पहिलीच्या विद्यार्थ्यांचा शारीरिक, मानसिक, बौद्धिक, भावनिक, सामाजिक विकास, गणनपूर्व तयारी तपासण्यात आली.

यावेळी अरुण पालवे, तुषार देशमुख यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन मुख्याध्यापक भाऊसाहेब कबाडी यांनी केले तर सहशिक्षक शिवराज वाघमारे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# श्रीसाई इंग्लिश मिडियम स्कूल व ज्युनिअर कॉलेजमध्ये आंतरराष्ट्रीय योगदिवस साजरा

नगर – श्रीसाई इंग्लिश मिडियम स्कूल व ज्युनिअर कॉलेजमध्ये आंतरराष्ट्रीय योग दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. आंतरराष्ट्रीय योग दिवस संपूर्ण जगभर साजरा केला जातो. पहिला आंतरराष्ट्रीय योग दिवस पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २१ जून २०१५ ला सुरू केला होता. याच्या औचित्याने हा दिवस योग दिन म्हणून साजरा होतो.




श्रीसाई इंग्लिश मिडियम स्कूल व ज्युनिअर कॉलेजमध्ये आंतरराष्ट्रीय योगदिवसानिमित्त योगाची प्रात्यक्षिके करताना विद्यार्थी. समवेत व्यासपीठावर डॉ. अरुण बोरुडे, डॉ. रवि ठाणगे, संस्थेचे उपाध्यक्ष नंदकिशोर भावसार, अध्यक्ष अशोक कानडे, प्रिन्सिपल तनुजा रनमोडे आदी.

या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून जनरल फिनिशियन डॉ. अरुण बोरुडे व डॉ. रवी ठाणगे उपस्थित होते. प्रमुख पाहुण्यांचा सत्कार शाळेचे उपाध्यक्ष नंदकिशोर भावसार यांनी केला. योग शिक्षक विक्रम चौहान सर यांचा देखील सत्कार करण्यात आला. योगविषयीची सरांनी विशेष माहिती विद्यार्थ्यांना दिली.

पहिली ते दहावी विद्यार्थ्यांना योग प्रशिक्षण देऊन योगाचे विविध प्रकार करण्यात आले. प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेले डॉ. रवि ठाणगे हे एक हुशार डॉक्टर आहेत. ते अहमदनगर येथे गॅस्ट्रोएनटेरोलॉजिस्ट म्हणून काम पाहतात. डॉ. ठाणगे यांनी मुलांना योगाचे विशेष महत्त्व विषद केले. वाढते ओबेसिटीचे प्रमाण कसे घातक ठरू शकते यासाठी व्यायाम व योगाचे किती महत्त्व आहे आपल्या जीवनामध्ये हे त्यांनी यावेळी सांगितले.

कार्यक्रमासाठी महर्षि प्रतिष्ठानचे अध्यक्ष अशोक कानडे, उपाध्यक्ष नंदकिशोर भावसार, प्रिन्सिपॉल तनुजा रनमोडे मॅडम, कु. सानिया कानडे हे उपस्थित होते.

या पूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेच्या शिक्षिका प्रिया मल्होत्रा व तनझीला शेख यांनी केले व आभार प्रदर्शन शाळेच्या शिक्षिका प्रणिता वारभूवन यांनी केले.

# बालवाडी हा मुलांच्या आयुष्यात महत्वाचा पाया

**ॲड. दिपलक्ष्मी म्हसे यांचे प्रतिपादन; महाराष्ट्र बालक शाळेत अनोखे स्वागत, आणले जोकर आणि डोनाल्ट डक व रंगीबेरंगी फुग्याचे तोरण, रांगोळ्या, नवीन खेळण्याने गेले हरखून**

नगर – बालवाडी हा मुलांच्या आयुष्यात महत्वाचा पाया असतो त्यांच्या जडणघडणीत तो महत्वाची भुमिका बजावतो त्यामुळे शिक्षकाइतकेच पालकांनी मुलाकडे लक्ष दयायला हवे शिक्षक हे मुलांचे उदयाचे भविष्य घडवत असतात आनंददायी तसेच हसतखेळत शिक्षण महत्वाचे ते या शाळेच्या माध्यमातून मिळते विद्यार्थ्यांकरीता शाळेने घेतलेला हा उपक्रम कौतुकास्पद आहे, असे प्रतिपादन अ. जि. म. वि. प्र. समाजाचे खजिनदार ॲड. दिपलक्ष्मी म्हसे यांनी केले.



लालटाकी रोडवरील महाराष्ट्र बालक मंदिर शाळेत पूर्वप्राथमिक बालवाडी विभागातील मुलांचे स्वागत समारंभात मुलांच्या हस्ते हवेत फुगे सोडून तसेच गुलाबपुष्प, पुस्तके देऊन स्वागत करण्यात आले. (छाया – उदय जोशी)

महाराष्ट्र बालक मंदिर शाळेतील मुलांकरीता एक अनोखी संकल्पनेतून मुलाकरीता काही तरी नवीन देण्याच्या उद्देशाने जोकर आणि डोनाल्ट डक यांना शाळेत आणले होते त्यामुळे छोटे मुल रडण्याचे जणू काही विसरले होते. लालटाकी रोडवरील महाराष्ट्र बालक मंदिर शाळेत पूर्वप्राथमिक बालवाडी विभागातील मुलांचे स्वागत समारंभात मुलांना हस्ते हवेत फुगे सोडून तसेच गुलाबपुष्प, पुस्तके देउन स्वागत करण्यात आले. अ. जि. म. वि. प्र. समाजाचे खजिनदार ॲड. दिपलक्ष्मी म्हसे, संस्थेचे सदस्या कल्पना वायकर, माजी मुख्याध्यापक सुरेश शेवाळे, मुख्याध्यापिका अर्चना गिरी, बालवाडी प्रमुख लता मोढवे, पालक नवनाथ खराडे, मनपाच्या ओंकारनगर शाळेचे मुख्याध्यापक भाउसाहेब कबाडी आदि उपस्थित होते.

मुख्याध्यापक अर्चना गिरी म्हणाल्या की,शाळेच्या माध्यमातून नेहमीच काही तरी वेगळे देण्याचे काम आम्ही करत असतो मुलांचा व पालकाच्या चेहऱ्यावरचा आनंद हा फार महत्वाचा आहे तो या माध्यमातून नक्कीच मिळतो जोकर हा त्यांचाच एक भाग आहे लहान लहान गोष्टीतून मिळणार आनंद अनमोल असतो.

कल्पना वायकर म्हणाल्या की आज मोबाईलचे प्रमाण वाढले आहे आज पालक व विद्यार्थी यांच्यातील संवाद हरवला आहे. टिव्ही,मोबाईल याचा पालकांनी त्याग करावा तरच तुम्ही मुलांना वेळ देउ शकाल. मुलांकडेही मोबाईल देउ नका.

माजी मुख्याध्यापक सुरेश शेवाळे म्हणाले की, नवागतांच्या स्वागताचा शासनाच्या निर्णयामुळे शाळांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण होते. पहिल्या दिवशी होणाऱ्या या स्वागतामुळे मुलांना शाळेची गोडी लागायला मदत होत असल्याने शासनाच्या निर्णयाचे कौतुक केले. मुलांनीही आनंदादायी वातावरणात हसत–खेळत अभ्यास करा

मोढवे म्हणाल्या की, शिक्षण घेताना ते हसतखेळत घ्यावे त्यामुळे शिक्षणाची गोडी लागते पालकांनी मुलांना शाळेत पाठवताना आनंदात पाठवा जेणेकरून त्याला शाळेची ओढ लागेल. शाळा नेहमीच वेगवेगळे मुलांच्या आवडीचे उपक्रम घेते.आज पालक व विद्याथी यांच्यातील संवाद हरवला आहे शाळेबरोबरच व पालकांच्याही मुलांच्या यशात वाटा असतो त्यामुळे पालकांनी मुलांच्या प्रगतीबाबत चौकशी करावी.

सुत्रसंचालन सुनिता शेवाळे यांनी केले आभार मनिषा सगळगिळे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वितेसाठी लता मोढवे, रेखा गायकवाड, मनिषा सगळगिळे, नयना जाधव, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी परीश्रम घेतले.

# झंवर हॉस्पिटल (१० वा वर्धापन दिन)

बुरूडगाव रोड व भोसले आखाडा या परिसरात अल्पावधीत नावारूपाला आलेले एक हॉस्पिटल अशी ख्याती असणाऱ्या झंवर हॉस्पिटलचा १० वर्षांचा प्रवास अगदी थक्क करणारा आहे.







डॉ. राहुल श्रीनिवास झंवर

डॉ. राहुल श्रीनिवास झंवर यांच्या मार्गदर्शनाखाली लावले गेलेले छोटेसे रोपटे, आज आरोग्यसेतूचा वटवृक्ष बनून सर्वांना निरामय, स्वास्थ्याची सावली देत आहे. यामागे डॉ. झंवर यांचे कष्ट आणि जिद्द दोन्ही आहेत. नाशिक येथून आयुर्वेदाचार्याची पदवी घेतल्यानंतर डॉ. झंवर यांनी 'स्वास्थ्य हॉस्पिटल' येथे पाठक डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली ३ वर्षे काम केले.

कोणत्याही कामात झोकून देण्याच्या प्रवृत्तीमुळे आणि रुग्णांना लवकरात लवकर बरे वाटावे या प्रवृत्तीमुळे त्यांना मेहनतीचे फळ लवकरच मिळू लागले. त्यांच्या आईच्या आजारपणासाठी त्यांनी स्वतः २ वर्षे आपल्या कामातला महत्त्वपूर्ण वेळ दिला. स्वतः चे हॉस्पिटलचे स्वप्न पूर्ण केल्यावरही त्यांची अभ्यासपूर्ण वृत्ती त्यांना स्वस्थ बसू देत नव्हती.

त्याचाच परिपाक म्हणजे आज उभे असलेले ३० बेडचे सुसज्ज झंवर हॉस्पिटल. जेथे लॅब, एक्सरेची देखील सुविधा देण्यात येते. तळागाळातल्या आणि इतरही सर्वांना आपलेसे करण्यात डॉ. राहुल यांचा हातखंडा आहे. मितभाषी आणि विनयशील अशा ह्या डॉक्टरांना त्यांच्या पुढील वाटचालीसाठी हार्दीक शुभेच्छा!

झंवर हॉस्पिटलचे वैशिष्ट्य म्हणजे जो स्टाफ हॉस्पिटलच्या सुरुवातीला जोडला गेला, तोच स्टाफ आजही १० वर्षांनंतर कार्यरत आहे. यावरूनच डॉ. राहुल यांची माणसे जोडण्याची कला दिसून येते.

जगाला त्रासदायक ठरलेल्या कोरोना काळातील २००० पेशंटला त्यांनी अल्पदरात वैद्यकीय सेवा उपलब्ध करून दिली. पद्मश्री पोपटराव पवार यांनी देखील या कार्यासाठी डॉ. झंवर यांचे खास अभिनंदन केले होते.

**– डॉ. शामा मंत्री**

# 'एक शाम रफी के नाम' लाईव्ह शोचे आयोजन

नगर – एस. के. प्रस्तुत हिंदी सिनेमाचे नावाजलेले गायक



स्वर्गीय मोहम्मद रफी यांच्या शताब्दी वर्षानिमित्त किरण उजागरे व समीर खान यांनी 'एक शाम रफी के नाम' या सुरेल व सदाबहार गीतांच्या लाईव्ह शोचे १३ जुलै रोजी संध्याकाळी ६:३० वाजता सावेडी येथील माऊली सभागृहात आयोजन केले असल्याची माहिती समीर खान यांनी दिली.

या शोमध्ये पुणे येथील सारेगामापा फेम आंतरराष्ट्रीय गायक रफी हबीब, प्लेबॅक सिंगर अबोली गिर्हे (मुंबई), गायीका तृप्ती बाविस्कर (मुंबई) व अहमदनगर येथील समीर खान, किरण उजागरे व आतिफ खान हे मोहम्मद रफी यांचे सदाबहार गीते सादर करणार आहे. संगीत संयोजक निलेश सोज्वळ, ॲडविन पेरेपाडम तर नावाजलेले दहा म्युझिशियन्स यात भाग घेणार आहे. निवेदन नाशिक येथील उस्मान पटणी करणार आहे. ध्वनी शांती ऑडिओ यांचे आहे. कार्यक्रमासाठी प्रवेशिका अनिवार्य असून त्यासाठी ७०२०६८१४२२ या नंबरवर संपर्क करून घ्यावी, असे आवाहन किरण उजागरे यांनी केले आहे.

# छत्रपती शाहू महाराजांचे सामाजिक न्यायाचे कार्य प्रेरणादायी

## डॉ. सुरेश पठारे यांचे प्रतिपादन

नगर – राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे सामाजिक न्याय क्षेत्रातील कार्य समाजासाठी प्रेरणादायी आहे. शासकीय नोकऱ्यांमध्ये मागासवर्गीयांना आरक्षण जातिभेद निर्मूलन या सामाजिक न्यायाच्या विचारांची मुहूर्तमेढ देशात राजर्षी शाहू महाराज यांनी रोवली. त्यांच्या विचार आणि कार्याचे आपण अनुकरण करून दुर्बल घटकातील समाजबांधवाना विकासाच्या मुख्य प्रक्रियेत आणण्यासाठी प्रयत्नशील राहिले पाहिजे, असे मत सीएसआरडी समाजकार्य महाविद्यालयाचे संचालक डॉ. सुरेश पठारे यांनी व्यक्त केले.



राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंती सामाजिक न्याय दिनानिमित्ताने त्यांच्या प्रतिमेस अभिवादन करताना सीएसआरडीचे संचालक डॉ. सुरेश पठारे. समवेत इतर प्राध्यापक वर्ग.

राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची जयंती सामाजिक न्याय दिनानिमित्ताने सीएसआरडीमध्ये आयोजित 'सामाजिक न्याय' विषयावरील एक दिवसीय परिसंवादात ते बोलत होते.

आपल्या अध्यक्षीय भाषणात श्री. पठारे म्हणाले, सामाजिक समतेचे पहिले पाऊल राजर्षी शाहू महाराज यांनी उचलले. अनिष्ट प्रथा, रुढी, परंपरांविरुद्ध महाराजांनी आवाज उठविला. सामाजिक आरक्षणाची देशात खऱ्या अर्थाने मुहूर्तमेढ शाहू महाराजांनी घातली. राजर्षी शाहू महाराज यांनी सामाजिक, शैक्षणिक, शेती, पत्रकारिता अशा अनेक क्षेत्रांत समाजातील गोरगरिबांना न्याय मिळवून देण्यासाठी मोठे कार्य केले.

समाजसुधारणेच्या चळवळीमध्ये त्यांचे मोठे योगदान आहे. महात्मा जोतिबा फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर या तीन महापुरुषांची नावे महाराष्ट्राच्या समाजसुधारणा चळवळीमध्ये नेहमी अग्रक्रमाने घेतले जाते. छत्रपती शिवाजी महाराजांचे आपल्या जनतेप्रती जे विचार होते, त्याच विचारांप्रमाणे शाहू महाराजांचे कार्य होते, असे ते म्हणाले.

तसेच २६ जून आंतरराष्ट्रीय अंमली पदार्थ विरोधी दिन म्हणून सुद्धा साजरा केला जातो. त्यामुळे यावेळी डॉ.सुरेश मुगुटमल यांनी कर्मचाऱ्यांना अंमली पदार्थांच्या सेवनाचे दुष्परिणाम सांगत सर्वाना व्यसनमुक्तीची सामुहिक शपथ दिली. अंमली पदार्थ आणि पदार्थांच्या प्रतिबंधासाठी, युनायटेड नेशन्स जनरल असेंब्लीने ७ डिसेंबर १९८७ रोजी हा ठराव मंजूर केला आणि तेव्हापासून दरवर्षी अंमली पदार्थांच्या सेवनाच्या दुष्परिणामांबद्दल लोकांना जागरूक करण्याच्या उद्देशाने जागतिक अमली पदार्थ विरोधी दिन साजरा केला जातो. आपणही सातत्याने व्यसनापासून दूर राहण्याचा संकल्प करून व्यसनमुक्तीबाबत जनजागृती केली पाहिजे असे सांगितले.

सीएसआरडी महाविद्यालयाच्या सभागृहात डॉ. सुरेश पठारे यांच्या अध्यक्षेखाली पार पडलेल्या या कार्यक्रमास डॉ.सुरेश मुगुटमल, डॉ. जेमोन वर्गीस, डॉ. विजय संसारे, डॉ. प्रदीप जारे, सॅम्युअल वाघमारे, विकास कांबळे, शरद गुंडरस, गिरीश शिरसाठ, किरण गीते, नाजीम बागवान, अमित सिंग यांच्यासह महाविद्यालयातील कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सॅम्युअल वाघमारे यांनी केले तर आभार डॉ. विजय संसारे यांनी मानले.

"हर काम देश के नाम"

**अहमदनगर छावनी परिषद**

एएमएक्स चौक, कैम्प भिंगार, अहमदनगर – ४१४००२

Email : ahmedngrcantt@gmail.com Website: ahmednagar.cantt.gov.in

पत्र सं. अहम/राजस्व/ई-छावणी/२०२४-२५ दिनांक : २७/०६/२०२४

**जाहीर नोटीस**

संदर्भ – दैनिक लोकमत व सकाळ वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेली दिनांक २०/५/२०२४ रोजीची जाहीर नोटीस

छावणी क्षेत्रामधील सर्व नागरिकांना कळविण्यात येते की, घरपट्टी बिल व पाणीपट्टीचे बिल हे ऑनलाईन echhawani.gov.in/citizen या वेबसाईट वर आलेले असून सर्व नागरिकांनी ते दिनांक ३०/०६/२०२४ या तारखेच्या आत ऑनलाईन पद्धतीने भरावे असे वरील संदर्भीय जाहीर नोटीस द्वारे कळविण्यात आले होते. तरी ज्या धारकांनी बिल ३०/०६/२०२४ पर्यंत भरलेले नाही. त्यांना दिनांक ०१/०७/२०२४ पासून देय रक्कमेवर रु. १००/- नोटीस फी आकारण्यात येईल व ०१/०९/२०२४ पासून देय रक्कमेवर प्रतिमाह १% व्याज आकारण्यात येईल. तरी सर्व मालमत्ताधारकांना आव्हान करण्यात येते की, घरपट्टी व पाणीपट्टीच्या प्रत्यक्ष बिलांची वाट न पाहता ऑनलाइन पद्धतीने घरपट्टी व पाणीपट्टी भरून प्रशासनास सहकार्य करावे.

सही/-
मुख्य कार्यकारी अधिकारी
छावनी परिषद, अहमदनगर

**जाहीर नोटीसीस हरकत**

तमाम लोकांस व विशेष करुन ॲड. श्री. प्रमोद कांतीलाल मेहेर, पत्ता. ४, गावेर्धन अपार्टमेंट, अहमदनगर व त्यांचे अशिल १. अर्जुनदास गुलाबराय खानचंदानी, २. विष्णु गुलाबराय खानचंदानी, ३. सनी चंद्रमोहन खानचंदानी व ४. चतुर्भुज गुलाबराय खानचंदानी सर्व रा. चित्रा टॉकीज समोर, अहमदनगर यांस प्रस्तुत जाहिर नोटीसीस हरकतीद्वारे कळविण्यात येते की, जिल्हा अहमदनगर पोटतुकडी व तालुका नगर पैकी अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील मौजे चाहुराणा बुद्रुक येथील टी. पी. स्कीम नं. ३ पैकी फायनल प्लॉट नं.८/२० व ८/२१ यांचे एकत्रित क्षेत्र ५५२.११ चौ. मी. या मिळकतीबाबत तारीख २५/०६/२०२४ रोजी दैनिक नवा मराठा या वर्तमान पत्रामध्ये ॲड. श्री. प्रमोद कांतीलाल मेहेर यांच्या मार्फत जाहिर नोटीस प्रसिध्दीस दिलेली आहे. सदर नोटीसीमध्ये ॲड. श्री. प्रमोद कांतीलाल मेहेर यांनी मोघम कथनाची जाहिर नोटीस प्रसिध्दीस दिली आहे व ती आमच्या अशिलास मुळीच कबुल व मान्य नाही.

आमचे अशिल निलेश अशोक नगरे, आशा शिवाजी नगरे, अश्विनी शिवाजी नगरे व राहुल शिवाजी नगरे, सर्व रा. शिवाजी स्वामील, स्टेशन रोड, अहमदनगर यांच्या वाचण्यात आली. सदर जाहिर नोटीस मध्ये नमुद फायनल प्लॉट नं.८/२० व ८/२१ च्या दक्षिण बाजुस प्लॉट नं. ८/१८ व ८/१९ आहे व त्यापैकी फायनल प्लॉट नं.८/१९ मध्ये आमचे अशिल व चंद्रमोहन गुलाबराय खानचंदानी व चतुर्भुज गुलाबराय खानचंदानी हे सहहिस्सेदार आहेत. तसेच सदर प्लॉट नं. ८/२० मध्ये संपुर्ण प्लॉटची मालकी अर्जुनदास गुलाबराय खानचंदानी व विष्णु गुलाबराय खानचंदानी यांची नसुन त्यामध्ये सदर मालकांची मालकी २७४.४ चौ.मी. क्षेत्राची आहे याचा उल्लेख देखील सदर जाहिर नोटीसीमध्ये नमुद नाही. तसेच प्लॉट नं. ८/१८,८/१९, ८/२० व ८/२१ चे क्षेत्रफळ प्रत्यक्ष जागेवर सिटी सर्व्हे उताऱ्यावर नमुद केल्याप्रमाणे भरत नाही म्हणजेच प्रत्यक्ष जागेवर सदर प्लॉटचे क्षेत्रफळ सिटी सर्व्हे च्या उताऱ्यावर नमुद क्षेत्रफळापेक्षा कमी आहे व सदर माहिती प्लॉट नं. ८/२० व ८/२१ चे विद्यमान मालकांनी जाणुन- बुजुन लपविलेले आहे व त्यामुळे दि. २५/०६/२०२४ रोजी दै. नवा मराठा या वर्तमान पत्रामध्ये सदर फायनल प्लॉट नं. ८/२० व ८/२१ बाबत ॲड. श्री. प्रमोद कांतीलाल मेहेर यांच्या मार्फत प्रसिध्द झालेल्या नोटीसीमध्ये सत्य परिस्थीतीचा उल्लेख करण्यात आलेला नाही. तसेच सदर जाहिर नोटीसीमध्ये नमुद प्लॉटचे क्षेत्रफळ जागेवर भरत नसल्यामुळे आमच्या अशिलाचा ताबा व जाहिर नोटीसीमध्ये नमुद मिळकत मालकांचा वाद आहे व त्याचे निवारण अद्यापपावेतो झालेले नाही. तसेच अशा परिस्थीतीमध्ये ॲड. श्री. प्रमोद कांतीलाल मेहेर यांच्या अशिलांनी सदर जाहिर नोटीसीमध्ये नमुद प्लॉटचा व्यवहार करुन खरेदीखत केल्यास त्यांना प्रत्यक्ष जागेवर जाहिर नोटीसीमध्ये नमूद केलेल्या ५५२.११ चौ.मी. क्षेत्राचा ताबा मिळणार नाही याची नोंद ॲड. श्री. प्रमोद कांतीलाल मेहेर यांनी व त्यांच्या अशिलानी घ्यावी. विनाकारण कोणाचीही फसवणुक होऊ नये या हेतुने प्रस्तुत जाहिर नोटीसीस हरकत प्रसिध्द केली असे.

येणे प्रमाणे जाहिर नोटीसीस हरकत प्रसिध्द केली आहे.

ता. २८/०६/२०२४.

ॲड. समीर वखारे
पत्ता :- ऑफीस नं. ५, पहिला मजला,
साई कॉर्नर बिल्डींग, चितळे रोड, अहमदनगर.
मो. नं. ९०११६७८९९९. ९८६०८०५५५९

# बालाजी फाउंडेशनची वृक्षारोपणाने शाहू महाराज जयंती साजरी



राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त बालाजी फौंडेशनतर्फे समाजकल्याण कार्यालय परिसरात वृक्षारोपण करताना समाज कल्याणचे सहाय्यक आयुक्त राधाकिसन देवढे.

नगर – पर्यावरणाचे प्रश्न सोडविण्यासाठी वृक्षारोपण व संवर्धनाची मोहिम राबविणाऱ्या बालाजी फाउंडेशनच्या वतीने राजर्षी शाहू महाराज यांची जयंती वृक्षारोपणाने साजरी करण्यात आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन कार्यालयाच्या आवारात समाजकल्याणचे सहाय्यक आयुक्त राधाकिसन देवढे यांच्या हस्ते वृक्षारोपण मोहिमेचा प्रारंभ करण्यात आला.

राधाकिसन देवढे म्हणाले की, छत्रपती शाहू महाराज यांनी कल्याणकारी राज्य चालविले. राजा असूनही दीन–दलित आणि शोषित वर्गाचे दुःख पुसून त्यांच्याशी जवळीक साधली. सर्व समाजाचा बिकट बनलेला पर्यावरणाचा प्रश्न वृक्षारोपणाने सुटणार असून, या उपक्रमाद्वारे शाहू महाराजांना खरी आदरांजली ठरल्याचे त्यांनी सांगितले.

व्याख्याते तथा लेखक आनंद शितोळे यांनी शाहू महाराज यांचे कार्य आणि व्यसन मुक्ती या विषयावर युवकांना मार्गदर्शन केले. बालाजी फाउंडेशनचे अध्यक्ष मेजर शिवाजी पठाडे म्हणाले की, निसर्गाच्या सानिध्यात जीवनातील तणाव दूर होतो. यासाठी शहर परिसर निसर्गाने फुलविण्याची गरज आहे. निसर्ग बहरल्यास पर्यावरणाचे प्रश्न सुटण्यास मदत होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमाप्रसंगी जिल्हा समाजकल्याण अधिकारी कोकाटे, लेखाधिकारी राहुल गांगुर्डे, अण्णाभाऊ साठे महामंडळाच्या व्यवस्थापिका प्रणिता सरपटे, वसंतराव नाईक महामंडळाचे सर व्यवस्थापक सांगळे, बार्टीचे प्रकल्प अधिकारी दिलावर सय्यद, बालाजी फाउंडेशनचे सचिव शिवाजी उबाळे, राज ठाणगे, प्रसिद्धी प्रमुख प्रशांत पाटील शेळके आदींसह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. प्रास्ताविक सौ. चितळे यांनी केले.

सूत्रसंचालन प्रियंका पाटील शेळके यांनी केले. आभार एजाज पिरजादे यांनी मानले.

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते कि, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली मिळकत विक्रीचा व्यवहार आमचे अशिलाबरोबर ठरलेला आहे. सदर मिळकत निर्वेध, निजोखमी आहे असे खरेदी देणाराचे म्हणणे आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते कि, सदर मिळकतीबाबत कोणताही चालू वाद असल्यास अथवा गहाण, दान, बक्षीसपत्र, अव्वल जप्ती, बॅंक बोजा, भाडेकरार, साठेकरार, मदार, मनाई हुकूम, स्थगिती, पोटगी, चार्ज, लीन, इजमेंट अगर इतर कोणताही चालू वाद असल्यास संबंधितांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांचे आत खालील पत्त्यावर समक्ष लेखी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांचे नकलासह आम्हास कळवावे व आमची खात्री करून द्यावी. मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास अथवा ज्याचे काही हक्क, हितसंबंध आहे त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहे असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुरा करतील. मग कोणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

हि नोटीस प्रसिध्दीस दिली. ता. २८/०६/२०२४

परिशिष्ट मिळकतीचे वर्णन

जिल्हा अहमदनगर, पोटतुकडी नगरपैकी, महानगरपालिका हद्दीतील मौजे शहनगर येथील खालील वर्णनाचा बिगरशेती प्लॉट मिळकत –

| म्यु. घ.नं. | सि.स.नं. | क्षेत्रफळ |
| --- | --- | --- |
| ३३३७ | २४७४/अ | १७९.९० चौ. मीटर |

(जागेवर प्रत्यक्षात क्षेत्र १११.१५ चौ.मी)

ही संपुर्ण मिळकत यात जुने बांधकाम झालेले असुन सदर बांधकामासह व सुख सुविधांसह

यांसी चतु:सिमा :
पुर्वेस – सिसन २४७०, २४७२ दक्षिणेस – वाग व पुढे रस्ता
पश्चिमेस – सि.स.नं. २४७४/ ब उत्तरेस – गल्ली

सदर मिळकतीचे विद्यमान मालक-
श्री. हॅरिसन वामनराव भोसले
श्री. उदय ताराचंद भोसले

ॲड. सचिन चांगदेव इथापे
बी–५६०३, दिल्लीगेट, अहमदनगर.
मो. ९८९०६६६९९४



चाँद सुलताना हायस्कूच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करताना जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ.

# चाँद सुलताना हायस्कूलच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान

नगर – शहरातील चाँद सुलताना हायस्कूल मधील टॉपर गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव जिल्हाधिकारी सिध्दाराम सालीमठ यांच्या हस्ते करण्यात आला. रोटरी इंटिग्रिटी क्लब व सांदीपनी अकॅडमीच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

जिल्हाधिकारी श्री.सालीमठ यांनी आपल्या आवडत्या क्षेत्रात करियर करण्याचे आवाहन करुन स्पर्धेच्या युगात विविध क्षेत्रात संधी असल्याचे सांगितले. यावेळी डॉ. प्रकाश कांकरिया. डॉ. सुधा कांकरिया, चाँद सुलतान हायस्कूलचे व्हाईस चेअरमन सय्यद असगर, सांदीपनी ॲकॅडमीचे के. बालराजू, चंदना शहा, पूजा पटनायक उपस्थित होते.

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांना जाहीर नोटीस द्वारे कळविण्यात येते की, खालील मिळकत परिशिष्टात वर्णन केलेली अहमदनगर शहर महानगरपालिका हद्दीतील तख्ती दरवाजा जवळ जमिन ही श्री. सुरेंद्र जयवंतराव शिंदे यांच्या मालकीची असून त्यांनी सदरील मिळकत आमच्या अशीलांना विक्री करण्याचे ठराव केले आहे. सदरील जमिन हे मी पुर्णपणे निर्वेध निजोखमी असल्याचे विद्यमान मालकीचे म्हणणे आहे. बोलणी सुरु असनू सदर मिळकत विकत घेण्याचा मानस आहे. तरी सदर मिळकत बाबत कोणाचेही कुठल्याही प्रकारचे हक्क, हितसंबध, दावा, मनाईहुकुम, अव्वल जप्ती, गहाण, दान, लीज, साठेखत, कुळ, ईजमेंट अथवा इतर कोणताही करार मदार असल्यास त्यांनी त्यांच्या असलेल्या हितसंबंधाबाबत, सदर नोटीस प्रसिद्ध झाल्या पासून ८ दिवसाच्या आत संबधीत मूळ कागदपत्रासह लेखी पुराव्यानीशी खालील पत्यावर समक्ष भेटून अथवा पोस्टाने तक्रार पाठवून आमची खात्री पटवून द्यावी व तशी लेखी पोहच घ्यावी.

अन्यथा सदर मिळकत ही निर्वेध, निजोखमी आहे. असे समजून आणि सदर मिळकती मध्ये कोणाचाही कोणत्याही प्रकारे हक्क, अधिकार, हितसंबंध नाहीत व असल्यास त्यांनी जाणीवपुर्वक सोडून दिलेले आहेत, असे गृहित धरुन आमचे अशिल सदर मिळकतीच्या खरेदी व्यवहार पुर्ण करतील. तद्नंतर कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही, तसेच परस्पर केलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. याची कृपया नोंद घ्यावी.

**मिळकतीची परिशिष्ठ - मौजे अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील तख्ती दरवाजा जवळ येथील.**

| स.नं. | क्षेत्र | चतु:सिमा | | | |
| --- | --- | --- | --- | --- | --- |
| | | पुर्वेस | दक्षिणेस | पश्चिमेस | उत्तरेस |
| ५३१७/२ | ९४.५ चौ.मी. आर.सी.सी. बांधकाम ४ मजली. ३४५०५९ | रस्ता | ५३१७/१ | ५३१७/३ | मुख्य रस्ता |

दिनांक :- २८/०६/२०२४.
ठिकाण :- अहमदनगर.

ॲड सय्यद साजीया
रेहामानीया कॉलनी, औरंगाबाद रोड,
डी.एस.पी. ऑफीस जवळ, अहमदनगर.
मो.नं. ८८०५०४६६८८

# बाई इचरजबाई फिरोदिया प्रशालेमध्ये परिवहन सहविचार सभा खेळीमेळीत

नगर – अहमदनगर एज्युकेशन सोसायटीची बाई इचरजबाई फिरोदिया प्रशालेमध्ये प्रशालेच्या मुख्याध्यापिका सौ. ज्योती सिसोदिया यांच्या अध्यक्षतेखाली शैक्षणिक वर्ष सन २०२४–२५ मधील परिवहन समिती स्थापन करण्यात आली. याप्रसंगी शिवशालेय विद्यार्थी वाहतूक संघटनेचे अध्यक्ष चंद्रकांत चिलका तसेच सर्व रिक्षा चालक उपस्थित होते

या सभेचे सूत्रसंचालन प्रसाद शिंदे यांनी केले, प्रास्ताविक मुख्याध्यापिका सौ. ज्योती सिसोदिया यांनी केले. प्रास्ताविकातून त्यांनी सांगितले की, वाहतुकीचे नियम सर्वांनी पाळावेत, विद्यार्थ्यांची वाहतूक करताना काळजी घ्यावी, पालक आणि शाळा यांच्यामधील दुवा रिक्षा चालक आहे असे त्यांनी सांगितले. त्याचबरोबर प्रशालेकडून वेळोवेळी आपणास वाहतूकीसंदर्भात मार्गदर्शन व मदत केली जाईल अशी हमी देखील दिली.

शिवशालेय वाहतूक संघटनेचे श्री. चिलका यांनी सर्व रिक्षा चालकांच्या वतीने काही मुद्दे मांडले, अडचणी मांडल्या आणि आभार मानले. प्रशालेच्या वतीने सर्व रिक्षा चालकांचे आभार विशाल तांदळे मानले. याप्रसंगी पराग विलायते, सौ. शकुंतला देसर्डा उपस्थित होते.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहमदनगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

विज्ञानविश्वाची माहितीपूर्ण रंजक सफर

# विज्ञानवार्ता



## ‘चॅटजीपीटी’च्या प्रेमात पडली तरुणी !

सध्या तंत्रज्ञान आपल्या जीवनाचा एक अविभाज्य भाग बनला आहे. आजकाल तंत्रज्ञान ज्या प्रकारे आपल्या जीवनावर वर्चस्व गाजवत आहे, एक दिवस असा येईल की, मनुष्य आणि यंत्र यांच्यात फारसा फरक राहणार नाही. सध्या, भावना हा रोबोट आणि मानव यांच्यातील खरा फरक आहे. मात्र, आता हे अंतरही आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या माध्यमातून मिटताना दिसत आहे. एका तरुणीचं चॅटजीपीटीवरच प्रेम जडले आहे. हे ऐकायला विचित्र वाटत असलं तरी हे खरं आहे. एक तरुणीने चॅटजीपीटीशी बोलायला लागली आणि नंतर चॅटबॉट सोबतचा संवाद तिला इतका आवडला की, तिला ती चॅटबॉट सोबत रोमँटिक गोष्टी बोलू लागली. चॅटबॉटवर तिचे प्रेम जडले असून, चॅटबॉट तिचा प्रियकर असल्याचेही तिने आईला सांगितलं आहे. अलीकडेच शेजारच्या चीनमधील एका तरुणीची बातमी व्हायरल झाली आहे. या तरुणीने चॅटजीपीटीसोबत बोलण्यास सुरुवात केली आणि नंतर तिला हे इतकं आवडलं की तिला ते सोडायचे नाहीय. या तरुणीने इन्स्टाग्रामप्रमाणे असलेल्या चीनच्या प्लॅटफॉर्म झियाओहोंगशू वर चॅटबॉट तिचा प्रियकर असल्याचं सांगितलं आहे. चॅटबॉटवर तिचे प्रेम असून तो तिचा प्रियकर असल्याचेही तिने तिच्या आईलाही सांगितले आहे. साउथ चायना मॉर्निंग रिपोर्टनुसार, लिसा नावाच्या स्वतःसाठी ‘डॅन’ चॅट जीपीटी सेवा घेतली होती. हे एक चॅटबॉटस् असून, यामध्ये तुमच्या बहुतेक प्रश्नांची उत्तरे मिळतात. हळूहळू, यांच्यातील संभाषण पुढे गेलं आणि लिसा ‘डॅन’ नावाच्या चॅटबॉटशी आता मैत्रिणीप्रमाणे गोड बोलू लागली. तिला तो इतका आवडू लागला की, ती त्याला आपला प्रियकर मानू लागली आणि सतत त्याच्याशी बोलू लागली. एवढेच नाही, तर तिने त्याची आईसोबतही ओळख करून दिली आहे. यावेळी ‘एआय’ तंत्रज्ञानापासून बनवलेल्या चॅटबॉटने हुबेहूब माणसाप्रमाणे प्रतिक्रिया दिली. आश्चर्याची बाब म्हणजे आईनेही आपल्या मुलीची काळजी घेतल्याबद्दल त्यांचे आभार मानले. विशेष म्हणजे ‘डॅन’ नावाच्या चॅटबॉटने लिसाशी रोमँटिक बोलण्यात कोणतीही कसर सोडली नाही. कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे, तो मानवी शब्द ऐकण्यात आणि त्यांना प्रतिसाद देण्यात पटाईत आहे. त्याने लिसाला ‘लिटल किटन’ असं टोपणनाव ठेवलं आहे. लिसाने त्याला बीचवर डेटवर नेले होते आणि त्याने हे सर्व पाहावे अशी तिची इच्छा होती. कोणत्याही जोडीदाराच्या शब्दांपेक्षा त्याचे शब्द अधिक सौम्य आणि गोड असतात. लिसाची कहाणी सध्या चीनसह जगभरात व्हायरल होत आहे आणि लोकांनी त्यावर रंजक प्रतिक्रियाही दिल्या आहेत.

## रोबोटिक सर्जरीमुळे मेंदूचे प्रत्यारोपण शक्य

अमेरिकन स्टार्टअप ब्रेनब्रिजने आर्टिफिशियल इंटेलिजेन्सवर (एआय) आधारित रोबोटिक शस्त्रक्रियेची संकल्पना जाहीर करत आशा-अपेक्षांचे नवे दालन खुले केले आहे. ॲडव्हान्स न्यूरोसायन्स व बायोमेडिकल इंजिनिअरिंग क्षेत्रात कार्यरत असलेल्या ब्रेनब्रिज या तंत्राच्या माध्यमातून व्हिडीओ



शेअर केला गेला असून, त्यात मेंदूचे प्रत्यारोपण कशा पद्धतीने होऊ शकते, याचे सादरीकरण केले आहे.

हा व्हिडीओ जवळपास आठ मिनिटांचा असून, एका यूट्यूब चॅनेलवर तो पोस्ट केला गेला आहे. सदर चॅनेलवर विज्ञान आणि विज्ञानाशी संबंधित नवनव्या क्रांतीवर प्रकाशझोत टाकला जातो. ब्रेनब्रिज ही जगातील पहिली मेंदू प्रत्यारोपणाची प्रणाली असून, या माध्यमातून ॲडव्हान्स रोबोटिक्स व आर्टिफिशियल इंटेलिजेन्सच्या माध्यमातून मेंदूचे प्रत्यारोपण केले जाते. सदर संकल्पना मूर्त स्वरूपात उतरवता आल्यास स्टेज-४ कॅन्सर, लकवा, अल्झायमर व पार्किन्सनसारख्या न्युरोडीजेनेरेटिव्ह आजारांपासून कायमची मुक्तता मिळू शकते.

सदर मेंदूच्या प्रत्यारोपणानंतर काही दिवसातच ती व्यक्ती सामान्य आयुष्य व्यतीत करू शकेल. मेंदूचे प्रत्यारोपण केले जात असले, तरी त्या व्यक्तीच्या जुन्या आठवणी, जुन्या सवयी, बौद्धिक कौशल्ये जशीच्या तशी राहतील, असा या स्टार्टअपचा दावा आहे. या शस्त्रक्रियेची सुरुवात डोनर व रिसिव्हर या उभयतांनाही भूल देऊन होईल. उभयतांनाही यावेळी ट्रेकियोटॉमीच्या माध्यमातून यांत्रिक श्वसन दिले जाईल, जेणेकरून सर्व अवयव सक्रिय असतील. दोघांच्या शरीरात आर्टिफिशियल प्लाझ्मा सॉल्युशन टाकले जाईल. यामुळे रक्ताच्या गुठळ्या होणार नाहीत आणि पुरेसा ऑक्सिजन मिळत राहील. सर्जिकल आर्मच्या माध्यमातून उर्वरित मुख्य शस्त्रक्रियेचे टप्पे पूर्ण केले जातील आणि ते पूर्ण झाल्यानंतर जवळपास ४ आठवडे शरीर कोमात ठेवले जाईल. या कालावधीत शरीर व डोके एकमेकांशी पूर्ववत जुळतील, असा उद्देश असेल. ब्रेनब्रिजची ही संकल्पना यशस्वी झाल्यास, मनुष्य अनेक मोठ्या आव्हानांवर सहज मात करू शकेल, असा सध्याचा होरा आहे.

## विमानाच्या इंजिनवर पंखे कशासाठी?

विमानानं उड्डाण केलं की त्याच्या पंखांची रचना, त्यावर असणारे लहान पंखे यांच्यामध्ये काही बदल होताना दिसतात. पंखे विशिष्ट दिशेनं झुकल्याचंही यावेळी पाहायला मिळतं. इंजिनवर असणारे हे लहानसे पंखे नेमके काय फायद्याचे असतात माहितीये? ते बहुतेक वेळा खालच्या दिशेनं का झुकलेले असतात याची माहिती आहे का?

विमानाच्या किंवा कोणत्याही कमर्शिअल फ्लाईटच्या इंजिनच्या किनाऱ्याशी हे लहानसे पंख असतात. यांना नॅकेले चाईन्स किंवा नॅकेले स्ट्रेक्स असं म्हणतात. हे पंखे जाणीवपूर्वक डेल्टा आकाराचे तयार केले जातात. हे स्ट्रेक्स एअरफ्लो अर्थात हवेचा झोत नियंत्रित करतात, या संपूर्ण प्रक्रियेमध्ये हे पंखे अजिबात हलत नाहीत. तज्ज्ञांच्या मते जेव्हा विमान उड्डाण घेतं तेव्हा ते जागीच फिरतं किंवा थेट हवेत झेपावतं.

त्यावेळी विमानाचं इंजिन हवेच्या प्रवाहाला थांबवून वेगळं करू पाहतं. यामुळं दबावक्षेत्र तयार होतं आणि विमान थांबण्याची भीती असते. हेच दबावक्षेत्र कमी ज्यामुळं हवेचा प्रवास या पंखांपर्यंतच येतो आणि विमान एका ठराविक उंचीवर पोहोचल्यास हेच पंखे हवेचा दाब नियंत्रित करून विमानही नियंत्रणात ठेवण्याचं महत्त्वाचं काम जवळपास सर्वच विमानांवर नॅकेल



लावण्यात येतात. एयरबस ए ३२० आणि बोइंग ७३७ सारख्या नॅरोबॉडीपासून बोईंग ७७७ आणि ७८७ या विमानांमध्येही हे लहान पंख असतात. काही विमानांमध्ये दोन्ही एका इंजिनाच्या दोन्ही बाजूला स्ट्रेक असतात. थोडक्यात हे लहानसे पंख विमान नियंत्रित ठेवण्यात मोठी भूमिका बजावताना दिसतात.

## लांब नखांचा विक्रम अबाधितच !

अमेरिकेची डायना आर्मस्ट्राँग ही सर्वाधिक नखे वाढवणारी पहिली महिला ठरली असून, तिचा हा विक्रम नजीकच्या कालावधीतही अबाधितच राहील, असे संकेत आहेत. तिच्या सर्व १० बोटांच्या नखांची लांबी दुहेरी बसच्या ४२ फूट १० इंच इतकी आहे.



या अमेरिकन महिलेने चक्क २५ वर्षे नखे कापली नाहीत. यासह तिने आपल्या नखांनी जगातील सर्वात अनोखा विक्रम रचला. या विक्रमासाठी तिचे नाव गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्येही नोंदवले गेले आहे. या महिलेचे म्हणणे आहे की, नखांमुळे तिला समस्यांना सामोरे जावे लागले; परंतु तिला आता याची सवय झाली आहे.

६३ वर्षीय डायनाने सांगितले की, २५ वर्षे नखे न कापण्याचे कारण म्हणजे तिची मुलगी लथिसा हिचा मृत्यू १९९७ मध्ये दम्याने झाला होता. लथिसा दर महिन्याला मॅनिक्युअर करून घ्यायची. तिला नखांची खूप आवड होती. डायनाने तिच्या मृत्यूच्या एक दिवस आधी लथिसाची नखे स्वच्छ केली होती आणि दुसऱ्या दिवशी तिची तब्येत अचानक बिघडली व तिचा झोपेतच मृत्यू झाला. त्यानंतर तिने म्हणूनच आजपर्यंत नखे कापली नाहीत. मात्र, यासाठी त्यांना अनेक त्याग करावे लागले. या नखामुळे तिला गाडी चालवता येत नाही. डायनाची नखे २०२२ मध्येच जमिनीला स्पर्श करू लागली. डायना या नखांना वेगवेगळ्या रंगांनी रंगवते. नखे न कापण्याचा निर्णय घेऊन आपल्या मुलीला श्रद्धांजली वाहिल्याचे डायनाने म्हटले आहे.

## हिरा बनणार १५ मिनिटांत ?


जगातील सर्वात महागडे रत्न म्हणजे हिरा, साहजिकच हिऱ्यापासून बनवलेल्या दागिन्यांच्या किमतीदेखील अन्य सर्व दागिन्यांच्या तुलनेत अधिकच असतात. नैसर्गिकरित्या हिरे तयार होण्याची एक विशिष्ट प्रक्रिया असते. कार्बन अणूंचे हिऱ्यात रूपांतर होण्यासाठी कित्येक गिगापास्कल्सचा प्रचंड दाब आणि हजारो वर्षांतील १५०० अंश सेल्सिअसची तीव्र उष्णता लागते. म्हणूनच बहुतांशी हिरे पृथ्वीच्या पृष्ठभागाच्या शेकडो मैल खाली गाडलेले आढळतात. पण, उच्च दाब आणि उच्च तापमानाची गरज न लागता १५ मिनिटांत जमिनीच्या पृष्ठभागावर म्हणजे प्रयोगशाळेत हिरे तयार झाले, तर तो चमत्कारच असणार आहे. शास्त्रज्ञांनी सध्या असे तंत्रज्ञान विकसित केले आहे, ज्या माध्यमातून येत्या काही वर्षांत सिंथेटिक हिरे उद्योगात क्रांती घडवू शकतात.



दक्षिण कोरियातील इन्स्टिट्यूट फॉर बेसिक सायन्समधील भौतिक रसायनशास्त्रज्ञ (फिजिकल केमिस्ट) रॉडनी रुफ यांनी नेचर जर्नलमध्ये हा रिसर्च प्रकाशित केला आहे.

आजपर्यंत ९९ टक्के सिंथेटिक हिरे उच्च-दाब आणि उच्च तापमान (एचपीएचटी) पद्धतीने बनवले गेले. या प्रक्रियेत कार्बन अणूंचे एका लहान बीजाभोवती किंवा स्टार्टेड डायमंडमध्ये (प्राथमिक अवस्थेतील हिरा) रूपांतर करण्यासाठी टोकाची परिस्थिती वापरली जाते. या पद्धतीत दोन उणिवा आहेत. या प्रक्रियेला बराच वेळ लागतो. जवळजवळ दोन आठवड्यानंतर हिरा तयार होते. शिवाय त्याची देखभाल करणेदेखील कठीण असते. या नव्या प्रक्रियेत नवीन पद्धतीसाठी वातावरणाचा दाब गरजेचा आहे आणि केवळ १५ मिनिटांत हिरा तयार होऊ शकतो. संशोधकांनी ग्रॅफाईट क्रूसिबलमध्ये सिलिकॉनसह इलेक्ट्रिकली गरम केलेले गॅलियम वापरले. समुद्रसपाटीच्या वातावरणाचा दाब असलेल्या चेंबरमध्ये क्रूसिबल ठेवले गेले. बऱ्याच प्रयोगांनंतर त्यांना आढळले की, गॅलियम-निकेल लोह मिश्रण आणि चिमूटभर सिलिकॉनसह हिरे तयार करण्यासाठी केवळ १५ मिनिटांत सर्वात आदर्श परिस्थिती निर्माण करता येते.

## उन्हातून आल्यानंतर पाणी पिताय?



उन्हाळ्यात सातत्याने तहान लागते. किंबहुना जितके पाणी आपण पितो, तितके कमीच इतकी उष्णता असते. कडक उन्हातून घरी पोहोचल्यानंतर बऱ्याच जणांना घटघट पाणी पिण्याची सवय असते. पण, तज्ज्ञांच्या मते उन्हातून आल्यानंतर लगेच अशा पद्धतीने पाणी पिणे धोकादायक असते.

तसे पाहता, निरोगी राहण्यासाठी कोणत्याही ऋतूत पाणी पिणे महत्त्वाचेच. उन्हाळ्यात तर जास्त पाणी प्यावे; कारण उष्णता वाढल्याने शरीरात पाण्याची कमतरता होते. अशा परिस्थितीत शरीराला थंड ठेवण्यासाठी भरपूर पाणी प्यावे. पण, ज्यावेळी कडक उन्हातून आपण घरी परततो, त्यानंतर किती वेळाने पाणी प्यावे, हे देखील तितकेच महत्त्वाचे आहे.

तज्ज्ञ सांगतात, त्यानुसार कडक उन्हातून घरी परतल्यानंतर काही काळ विश्रांती घेणे महत्त्वाचे ठरते. त्यानंतर शरीर थंड झाल्यावरच पाणी प्यावे. पण, शक्यतो थंड पाणी पिणे टाळायला हवे. सुरुवातीला कोमट पाणी घेतल्यास शरीराचे तापमान नियंत्रणात राहते व पचनक्रियाही चांगली राहते. उन्हातून घरी आल्यानंतर एकाचवेळी जास्त पाणी न पिता थोडे थोडे पाणी प्यावे. कडक उन्हातून परतल्यावर लगेच पाणी पिल्यास यामुळे सर्दी- खोकल्याचा त्रास वाढू शकतो. उन्हातून घरी आल्यानंतर काही वेळ बसून राहिल्यास शरीराचे तापमान सामान्य पातळीवर येईल. त्यानंतर पाणी घेता येईल. शक्यतो पंधरा मिनिटांनीच पाणी प्या. उशिराने पाणी प्यायल्यास सर्दी, संसर्ग आणि चक्कर येण्याचा धोका राहत नाही.



## स्ट्रेस हार्मोन कमी करायचंय?

‘कोर्टिसोल’ हा एक प्रकारचा संप्रेरक आहे, जो अधिवृक्क ग्रंथींद्वारे तयार केला जातो. कोर्टिसोलच्या उच्च पातळीमुळे तणाव, चिंता आणि लठ्ठपणा यांसह अनेक समस्या उद्भवू शकतात. स्ट्रेस हार्मोन म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कोर्टिसोलला पौष्टिक आहाराद्वारे नियंत्रित करता येते. येथे अशाच काही नैसर्गिक पदार्थांबद्दल माहिती दिली जात आहे, जे कोर्टिसोलची पातळी कमी करण्यात मदत करू शकतात...

**बदाम:** दररोज सुमारे चार ते पाच बदाम खाल्ल्याने तुमची तणावाची पातळी कमी होऊ शकते. बदामामध्ये मॅग्नेशियम मुबलक प्रमाणात आढळते, जे कोर्टिसोल नियंत्रित करण्यात महत्त्वाची भूमिका बजावते.

**डार्क चॉकलेट :** डार्क चॉकलेट आणि कोको असलेल्या गोष्टी खाल्ल्याने कोर्टिसोल कमी होण्यास मदत होते. तथापि, दररोज २०-३० ग्रॅमपेक्षा जास्त डार्क चॉकलेटचे सेवन करू नये.

**पालक-** तुमची तणाव संप्रेरक पातळी नियंत्रणात ठेवण्यासाठी दररोज एक कप पालक खा. पालक हा ताण कमी करणाऱ्या आहारासाठी उत्तम पर्याय बनतो.

**लसूण:** लसणात आढळणारे एलिसिन नावाचे संयुग कोर्टिसोलचे उत्पादन कमी करते. याने ताण प्रतिसाद सुधारण्यास मदत होते. दररोज किमान ४ ग्रॅम लसूण खा.

**ब्रोकोली:** ब्रोकोलीमध्ये व्हिटॅमिन सी भरपूर प्रमाणात असते, जे कोर्टिसोलची पातळी कमी करण्यास मदत करते. दररोज एक कप ब्रोकोली खाल्ल्याने तुमच्या शरीराला तणावाचा सामना करण्यासाठी पुरेसे व्हिटॅमिन सी मिळू शकते.

**ग्रीन टी:** ग्रीन टीमध्ये एल-थेनाईन नावाचे अमिनो ॲसिड असते, जे आराम करण्यास आणि तणाव पातळी कमी करण्यास मदत करते.


**ऑलिव्ह ऑईल :** ऑलिव्ह ऑईल विशेषतः एक्स्ट्रा व्हर्जिन, हेल्दी फॅटस्‌मध्ये समृद्ध आहे, जे जळजळ आणि कोर्टिसोलची पातळी कमी करण्यास मदत करते.

**केळी:** पोटॅशियम आणि व्हिटॅमिन बी६ केळीमध्ये मुबलक प्रमाणात आढळतात, जे कोर्टिसोल नियंत्रित करण्यास मदत करतात. रोज एक केळी खाल्ल्याने तुमचे स्ट्रेस हार्मोन्स कमी होण्यास मदत होते.

## चक्रीवादळांच्या नावाची कथा

युनायटेड नेशन्स एजन्सी जागतिक हवामान संघटनेच्या मते, एका विशिष्ट भौगोलिक स्थानावर किंवा संपूर्ण जगामध्ये एका वेळी एकापेक्षा जास्त चक्रीवादळे असू शकतात आणि ते एक आठवडा किंवा त्याहून अधिक काळ ती राहू देखील शकतात. त्यामुळे गोंधळ टाळण्यासाठी हे प्रयोजन करण्यात आले. सुरुवातीला वादळांना कोणताही देश नावे देऊ शकत होता, मात्र त्यामुळे गोंधळ होऊ लागला. नंतर, हवामानशास्त्रज्ञांनी अधिक संघटित आणि कार्यक्षम प्रणालीअंतर्गत एका यादीतून वादळांची नावे देण्याचा निर्णय घेतला.

जागतिक मेट्रोलॉजिकल ऑर्गनायझेशन आणि युनायटेड नेशन्स इकॉनॉमिक अँड सोशल कमिशन, १३-राष्ट्रीय संस्था, जगभरात चक्रीवादळांना नाव देतात. या दोन्ही संघटनातील समाविष्ट १३ देशांमध्ये भारत, बांगलादेश, म्यानमार, पाकिस्तान, मालदीव, ओमान, श्रीलंका, थायलंड, इराण, कतार, सौदी अरेबिया, संयुक्त अरब अमिरात आणि येमेन यांचा समावेश आहे. आठ अक्षरांपेक्षा जास्त हे नाव असू नये, अशी एक नियमावली देखील तयार करण्यात आली आहे. ते लिंग, राजकारण, धार्मिक श्रद्धा आणि संस्कृतींबाबत तटस्थ असतात. हे नाव कोणत्याही देशाचा अपमान करणारे नसावे, असेही यामध्ये म्हटले आहे. एकदा एखादे नाव वापरले, की ते पुन्हा वापरता येत नाही. देशांनी दिलेल्या नावांची यादी तयार केली आहे.



मध्यंतरी, बंगालच्या खाडीत आलेल्या रेमल चक्रीवादळाला नाव ओमानने दिले होते. ‘रेमल’ हा अरबी भाषेतील शब्द आहे. याचा अर्थ वाळू किंवा रेती असा होतो.

## बटाटेखाऊ भारतीय !

भारतात भाज्यांचा वापर अर्थातच अनन्यसाधारण रहात आला आहे. वर्षभर पनीर, भेंडी, गवार, बटाटे, टोमॅटो, कांदे यांसह डझनभर भाज्या बनवल्या जातात. पण, त्यापैकी एक अशी भाजी आहे, जी भारतीय लोक सर्वात जास्त खातात. ती म्हणजे बटाटा.



सर्व भाज्यांसमवेत चालणारी आणि चवीलाही चांगली लागणारी ही भाजी भारतात सर्वाधिक वापरली जाते, असे आढळून आले आहे. काहीवेळा भारतीय स्वयंपाकघरात हिरव्या भाज्या तयार केल्या जातात. भेंडी, गवार, भोपळा, दोडका, पडवळ, कोबी, वाटाणा भाजी आदींचा समावेश होतो. यामध्ये ज्यात शक्य आहे, त्यात बटाटा वापरला जातो. इतकेच नव्हे, तर अनेक प्रकारच्या स्नॅक्समध्ये देखील बटाट्याचा सर्वाधिक वापर होतो.

भारतातील कॅपिटो बटाटे २०२१ च्या अहवालानुसार, एक व्यक्ती एका वर्षात जास्तीत जास्त २५ किलो बटाटे खातो. हे प्रमाण इतर भाज्यांपेक्षा जास्त आहे.

एका आकडेवारीनुसार, २०२१ मध्ये जगभरात ३७६ दशलक्ष मेट्रिक टन बटाट्यांचे उत्पन्न घेण्यात आले होते. ९४ दशलक्ष उत्पादनासह चीन जगातील देशांमध्ये अव्वल आहे. भारत दुसऱ्या क्रमांकावर आहे, तर रशिया तिसऱ्या व युक्रेन चौथ्या क्रमांकावर आहे. यानंतर अमेरिका आणि बांगलादेशसारखे देश राहिले आहेत.

भारतापेक्षा आणखी एक देश असाही आहे, जिथे बटाट्याचा सर्वाधिक वापर केला जातो. भारतापेक्षा बेलारूसमध्ये जास्त लोक बटाटे खातात. मिळालेल्या माहितीनुसार, बेलारूसमधील एक व्यक्ती दरवर्षी सुमारे २०० किलो बटाटे खाते आणि हे प्रमाण भारताच्या तुलनेत खूपच अधिक आहे.

## सर्वात छोटे कारागृह !

भल्यामोठ्या तुरुंगांची चर्चा होते, त्यावेळी तिहार, येरवडाचे नाव पुढे येते. सेंट्रल जेलच्या वेबसाईटनुसार, तिहार कारागृहाची १० हजार २६ कैद्यांना सामावून घेण्याची क्षमता आहे. मात्र, प्रत्यक्षात तेथे १९ हजार ५०० हून अधिक कैदी ठेवले जातात. आता ही झाली मोठी कारागृहे. मात्र, जगातील सर्वात छोटे कारागृह कुठे आहे, याची क्वचितच कल्पना असेल. ब्रिटनमधील सार्क बेटावर जगातील सर्वात छोटे कारागृह वसलेले असून, येथे फक्त दोनच कैद्यांना ठेवता येते, अशी त्याची रचना आहे. १६८ वर्षांपूर्वी या कारागृहाची उभारणी झाली होती.

ब्रिटनमधील नोंदीनुसार, १८५६ मध्ये सदर कारागृह बांधले गेले. यात आधीपासून केवळ दोनच कैद्यांना ठेवता येऊ शकते. आश्चर्य म्हणजे या दीड शतकांहून अधिक वर्षांच्या कालावधीत या कारागृहात काहीही बदल करण्यात आलेला नाही. आतील रचना मात्र बदलली गेली असून, विजेची सोय तेथे उपलब्ध करून देण्यात आली आहे. २०२३ मधील जनगणनेनुसार, या बेटावर ५६२ लोकांचे वास्तव्य राहात आले आहे. या कारागृहाची उभारणी कशी झाली, ते ही आश्चर्याचे आहे. १८३२ मध्ये न्यायालयाने कारागृह उभारण्याचे आदेश दिले. मात्र, त्याकाळी यासाठी पैसे वेळेत उपलब्ध न झाल्याने कारागृह उभारणीला चक्क २४ वर्षे लागली. या कारागृहातील एक खोली ६ बाय ६ फूट, तर दुसरी खोली ६ बाय ८ फुटांची आहे. दोन्ही खोल्यांमध्ये लाकडाचे हलके बेड



आहेत. येथे जास्तीत जास्त २ किंवा ३ कैदी ठेवले जाऊ शकतात. मात्र, या बेटावर मुळात गुन्ह्यांचे प्रमाणच इतके कमी आहे, की यामुळे पूर्ण बेटावर केवळ दोनच पोलिस तैनात असतात. त्यामुळे जवळपास या कारागृहाचा वापर होतच नाही.

# महेश नागरी सहकारी पतसंस्थेच्या संचालक मंडळाची निवडणूक बिनविरोध


डॉ. चंगेडे अशोक


मुनोत शांतीलाल


भंडारी सुंदरलाल


चोरडिया प्रकाश


सपकाळ संजय


भंडारी विनोद


बोरा कांतीलाल


भंडारी सुशील


गुंदेचा पवन


गांधले सुदाम


मुनोत संजय


शिंगवी नितीन


पवार मारुती


बोरा वैशाली


शिंगवी अंजली


पतके किरण


हिरणवाळे शंकरराव

नगर – महेश नागरी सहकारी पतसंस्था मर्या., भिंगार या संस्थेच्या संचालक मंडळाची निवडणूक अखेर बिनविरोध झाली आहे. संस्थेच्या संचालक मंडळाच्या सर्वच्या सर्व १७ जागा बिनविरोध झाल्या आहेत. अर्ज माघारीच्या अखेरच्या दिवशी २७ जून रोजी काही उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज मागे घेतल्याने ही निवडणूक बिनविरोध झाल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी अल्ताफ शेख यांनी जाहीर केले आहे.

सर्वसाधारण मतदार संघातून निवडून आलेले संचालक (जागा १२)– डॉ. चंगेडे अशोक शांतीलाल, मुनोत शांतीलाल माणकचंद, भंडारी सुंदरलाल सोहनलाल, चोरडिया प्रकाश मांगीलाल, सपकाळ संजय माधवराव, भंडारी विनोद बन्शीलाल, बोरा कांतीलाल मोतीलाल, भंडारी सुशील सुंदरलाल, गुंदेचा पवन सुरेश, गांधले सुदाम तुळशीराम, मुनोत संजय शांतीलाल, शिंगवी नितीन पोपटलाल

अनुसूचित जाती जमाती (जागा १)– पवार मारुती कुंडलीक

महिला राखीव (जागा २)– बोरा वैशाली वर्धमान, शिंगवी अंजली नितीन

इतर मागास प्रवर्ग (जागा १)– पतके किरण प्रकाश

वि.जा.भ.ज./वि.मा.प्र. (जागा १)– हिरणवाळे शंकरराव सिदप्पा.

संस्थेच्या संचालक मंडळ निवडणुकीसाठी ७ जुलै रोजी मतदान घेण्यात येणार होते. सुधारित निवडणूक कार्यक्रमानुसार २७ जूनपर्यंत उमेदवारी अर्ज माघारीसाठी अंतिम मुदत देण्यात आली होती. या मुदतीत गुगळे प्रेमराज मोहनलाल, गुगळे रतिलाल सिमरतमल, लुणिया बिपिनचंद्र (बाळूशेठ) बन्शीलाल, शिंगवी राजेंद्र नवलमल यांनी माघार घेतली तर विद्यमान संचालक डॉ. गांधी श्रीकांत लक्ष्मीदास यांनी अर्ज भरला नव्हता. नवीन पैकी मुनोत प्रमोद मानकचंद, पोखरणा विनोद चंपालाल यांनीही माघार घेतली. महिला राखीव मधून लुणिया लता राजेंद्र यांनी अर्ज भरला नाही. तर पोखरणा साधना विनोद यांनी माघार घेतली. अ.जाती जमाती मधून छजलानी संदीप बाबुराव यांनीही माघार घेतली. इ.मा.प्र. वर्ग मधून गांधले सुदाम तुळशीराम यांनीही माघार घेतली. वि.जा.भ.ज./वि.मा.प्र.मधून तोतरे गणेश प्रमोद व तोतरे कल्पेश कृष्णकांत यांनी माघार घेतल्याने संपूर्ण पॅनल बिनविरोध निवडून आले असल्याची माहिती निवडणूक अधिकारी अल्ताफ शेख यांनी दिली.

सदर निवडणूक बिनविरोध होण्यासाठी संस्थेचे संस्थापक माजी चेअरमन नंदकुमार (मन्नूशेठ) झंवर, विद्यमान चेअरमन डॉ. अशोक चंगेडे, व्हा. चेअरमन शांतीलाल मुनोत, जेष्ठ संचालक सुंदरलाल भंडारी व सर्व संचालक यांनी प्रयत्न केले, असे संस्थेच्यावतीने सांगण्यात आले.

# बोगस रेशनकार्ड वाटप करणाऱ्यांवर कारवाई करा अन्यथा तीव्र आंदोलन

## बांगलादेशीय घुसखोरीमुळे भूमिपुत्र रेशनधारक अन्न–धान्यापासून वंचित


बोगस रेशन कार्ड वाटपावर कारवाई व्हावी तसेच लाभार्थ्यांना अन्न–धान्य मिळावे याबाबतचे निवेदन अन्नधान्य वितरण अधिकारी यांना शिवराष्ट्र सेनेच्यावतीने देण्यात आले. याप्रसंगी राष्ट्रीय अध्यक्ष संतोष नवसुपे, मनिष औशिकर, अनुप गांधी, अर्चना परकाळे, नवनाथ मोरे, सागर भंडारी आदी.

नगर – गेल्या अनेक वर्षांपासून रेशन अन्नधान्यापासून लाभार्थी वंचित असून या लाभार्थ्यांनी रेशन अन्नधान्य पुरवठा अधिकाऱ्यास वेळोवेळी स्वतःचे तक्रारीचे पत्र देऊन आम्हाला केशरी कुपन असून यावर धान्य मिळावे, अशी मागणी केली. स्थानिक रेशन वाटप दुकानदारांकडून पत्र देऊन देखील अधिकाऱ्यांनी या पत्रास केराची टोपली दाखवली. याबाबत शिवराष्ट्र सेना पक्षाच्यावतीने अन्नधान्य वितरण अधिकारी यांना निवेदन देऊन आंदोलनाचा इशारा देण्यात आला.

याप्रसंगी राष्ट्रीय अध्यक्ष संतोष नवसुपे, शहराध्यक्ष मनिष औशिकर, अल्पसंख्याक आघडी प्रमुख अनुप गांधी, महिला आघाडी प्रमुख अर्चना परकाळे, संघटन मंत्री नवनाथ मोरे, सागर भंडारी आदी कार्यकर्ते उपस्थित होते

यावेळी संतोष नवसुपे म्हणाले, स्थानिक भूमिपुत्रांना व भारतीय नागरिकांना जर अन्नधान्य वितरण होत नसेल तर याचा अर्थ देशात, राज्यात व शहरात बांगलादेशीय घुसखोर व त्यांना काही चिरीमिरी देऊन बोगस रेशन धान्य मिळत असेल तर या संख्यावाढीमुळे आज स्थानिक भूमिपुत्र अन्नधान्य मिळण्यापासून वंचित राहत आहे. याबाबत तातडीने सुधारणा व्हावी, तसेच ई–केवायसी रद्द करण्यात यावी, अन्यथा तीव्र आंदोलन केले जाईल, असा इशारा त्यांनी दिला आहे.


भारतीय जनता युवा मोर्चाने खासदार ओवेसी यांच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करावा या मागणीचे निवेदन जिल्हाधिकारी यांना दिले. यावेळी शहर जिल्ह्यध्यक्ष मयूर बोचुघोळ, रुदरेश अंबाडे, ओंकार लेंडकर, आकाश सोनावणे, कैलास गर्जे, अजित कोतकर, विशाल कर्डीले, सिद्धार्थ सीसोदे, सुनील सकट आदी

# खासदार ओवेसी यांच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करा

## भाजपा युवा मोर्चाचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

नगर – भारतीय जनता युवा मोर्चाने खासदार ओवेसी यांच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करावा या मागणीचे निवेदन जिल्हाधिकारी यांना दिले. यावेळी शहर जिल्ह्यध्यक्ष मयूर बोचुघोळ, रुदरेश अंबाडे, ओंकार लेंडकर, आकाश सोनावणे, कैलास गर्जे, अजित कोतकर, विशाल कर्डीले, सिद्धार्थ सिसोदे, सुनील सकट आदी पदाधिकारी उपस्थित होते.

संसद भवनात नवनिर्वाचित खासदारांचा शपथविधी कार्यक्रम झाला. यावेळी खासदार ओवेसी यांनी जयफिलीस्तान अशी घोषणा दिल्याचे देशातील हजारो नागरिकांनी पाहिले. भारत मातेचे सुपुत्र म्हणून आम्ही अशी मागणी करत आहोत की, खासदार ओवेसी यांच्यावर देशद्रोहाचा गुन्हा नोंदवून त्यांची खासदारकी तात्काळ रद्द करून त्यांना अटक करण्यात यावी, अशी मागणी निवेदनाद्वारे केली आहे.

# साईदीप हॉस्पिटलमध्ये ५ जुलैपर्यंत वंध्यत्व निवारण शिबिराचे आयोजन

## लाभ घेण्याचे डॉक्टर वैशाली किरण यांचे आवाहन

नगर – मुलबाळ होत नाही म्हणून जीवनात नैराश्य आलेले अनेक दांपत्य व्यथित होतात, पण आधुनिक प्रभावी उपचार पद्धतीमुळे वंध्यत्व निवारण होऊ शकते. साईदीप हॉस्पिटल, अहमदनगरमध्ये ५ जुलैपर्यंत सवलतीच्या दरात, उपचारांवर विशेष सूट देण्यात येणार आहे, अशी माहिती वंध्यत्व निवारण व प्रसूतीतज्ञ डॉ. वैशाली किरण यांनी केले आहे.

या शिबिरात वंध्यत्व निवारणासाठी आवश्यक तपासण्या सवलतीच्या दरात करण्यात येतील. वंध्यत्व येण्याचे अनेक कारणे आहेत. तर दाम्पत्यांने तपासणी करून घ्यावी म्हणजे काही अनियमितता असल्यास त्वरित उपचार केल्यास मुलबाळ होण्याचे स्वप्न साकार होऊ शकते.

महिलांमधील वंध्यत्वाची कारणे – हार्मोनल इमबॅलेन्स, PCOD, थायरॉईड तसेच वंध्यत्व हे फक्त महिलांमध्ये नसते पण चुकीची जीवनशैली, व्यसनधिनता आणि अति–प्रमाणात तणाव यामुळे पुरुषांमध्ये शुक्रजंतूंची कमतरता किंवा असामान्य शुक्राणू अशा अन्य अनेक कारणानंमुळे वंध्यत्व निर्माण होते. पण आता आधुनिक उपचार पद्धतीमुळे यावर मात करणे शक्य आहे, असे डॉ. वैशाली किरण यांनी सांगितले आहे.

९५५२१०५८४३, ८४४६५१०३८६ या नंबरवर फोन करून डॉक्टरांना भेटून सल्ला घेऊ शकता.

# नगर शहर विधानसभेची जागा भाजपकडे घेण्यासाठी आग्रह

## विनोद तावडे यांची वसंत लोढा यांनी घेतली भेट


भाजपचे केंद्रीय नेते विनोद तावडे यांची भेट घेवून त्यांचा सत्कार करताना वसंत लोढा आणि कार्यकारिणी सदस्य.

नगर – नगर शहर विधानसभेची जागा परंपरेप्रमाणे भाजपा सेना युतीचा बालेकिल्ला होता आता प्रत्यक्ष युतीमध्ये फाटा फूट झाली असली तरी भाजपच्या आणि शहर विकासाच्या बाजूने असणारी मते भाजपाकडेच आहेत त्यामुळे सध्याच्या भाजपा सेना युतीचा उमेदवारच येथे प्रभावी ठरू शकतो त्यामुळे नगर शहर विधानसभेची जागा भाजपाकडे घेण्यासाठी विनोद तावडे यांना आग्रह करण्यात आला आहे.

दिल्ली येथे जाऊन भाजपाचे प्रदेश कार्यकारणी सदस्य आणि पंडित दीनदयाळ नागरी सहकारी पतसंस्थेचे चेअरमन, मंदिर बचाव कृती समितीचे अध्यक्ष वसंत लोढा यांनी विनोद तावडे यांची भेट घेतली.

विनोद तावडे यांच्याकडे लोकसभा निवडणुकीत पक्ष पातळीवर महाराष्ट्रात सर्वेक्षण आणि उमेदवारी निश्चितेची महत्त्वाची जबाबदारी होती विधानसभा निवडणुकीत तीच जबाबदारी त्यांच्याकडे देण्यात आली आहे. त्यामुळे जागा वाटपात आणि उमेदवार निश्चितीमध्ये त्यांची भूमिका महत्त्वाची आहे.

नगर शहर विधानसभा मतदारसंघाची जागा भारतीय जनता पार्टीने आपल्याकडे घ्यावी याकरता करण्यात आलेले सर्वेक्षण आकडेवारी आणि गृहीतकांची मांडणी वसंत लोढा यांनी शिष्टमंडळासमवेत जाऊन तावडे यांच्याकडे केली.

नगर शहरात पाच वेळा अनिल राठोड हे शिवसेना भाजपा युतीचे उमेदवार म्हणून निवडून आले. नंतर झालेल्या राजकारणात शिवसेना भाजपा समोरासमोर लढली आणि मतांची फाटाफूट झाली त्यात राठोड यांचा पहिल्यांदा पराभव झाला. राष्ट्रवादीने विजय मिळवला. त्यावेळी त्यांच्या विरोधात काँग्रेस होती. नंतर भाजपा शिवसेना एकत्र असताना देखील राष्ट्रवादीलाच विजय मिळाला. आता राष्ट्रवादी अजित पवार गटाकडे फारसे मताधिक्य राहिलेले नाही हे लोकसभा निवडणुकीने सिद्ध केले. नगर शहर विधानसभा मतदारसंघात २०१९ आणि २०२४ या दोन्ही टर्ममध्ये सुजय विखे यांना मोठे मताधिक्य मिळाले. यावर्षी जरी मताधिक्य भेटले असले तरी ते कमी आहे. याचाच फायदा घेऊन या मतदारसंघात विधानसभा निवडणुकीत कमळ चिन्ह फक्त लोकसभा निवडणुकीत चालले आता ते विधानसभा निवडणुकीत मतदारांना दिले तर आपला उमेदवार निश्चितपणे सर्वांना भारी ठरेल. नगर शहर हे विकासापासून वंचित आहे. दुर्लक्षित आहे. विकासाला मोठा वाव आहे.

उड्डाणपूल आणि बाह्यवळण रस्ता यामुळेच नगर शहर आता विकासाच्या प्रगतीपथावर येत आहे, असे मतदारांना जाणवले आणि त्यांनी मोठे मतांचे दान लोकसभेत सुजय विखे यांना दिले. तेच पुढे विधानसभेत परावर्तित व्हावे असे जर आपल्याला वाटत असेल आणि नगर शहर विधानसभेची जागा भाजपा, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस महायुती जिंकू शकेल, असा विश्वास जर आपल्याला असेल तर ही जागा भाजपने आपल्याकडे घेऊन कमळ चिन्हावर लढवावी. आमदार अनिल राठोड यांनी नगर शहरात रुजवलेले हिंदुत्व आणि भयमुक्त नगरचा नारा, याची गरज नगरकरांना आजही वाटते आहे. राठोड यांचे नाव प्रत्येक दुर्घटनेनंतर मतदार घेतात अशाच नेतृत्वाची आवश्यकता नगरला आहे असे मतदारांना वाटते म्हणूनच पंडित दीनदयाळ यांचा विचार पुढे नेणाऱ्या वसंत लोढा यांनी ही जागा भाजपाने घ्यावी कारण महायुतीच्या माध्यमातून ती जागा विद्यमान उमेदवाराला मिळाली तर ती सीट धोक्यात येऊ शकते असा सर्व्हे सांगतो त्यामुळे भाजपाला उमेदवारी मिळावी असा आग्रह या शिष्टमंडळाने तावडे यांच्याकडे धरला.

# यश–अपयशाचा विचार न करता जिद्दीने आपले ध्येय साध्य करावे

## राणीताई लंके यांचे प्रतिपादन; माजी नगरसेविका सुवर्णा जाधव व नंदनवन मित्र मंडळाच्यावतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार


माजी नगरसेविका सुवर्णा जाधव व नंदनवन मित्र मंडळाच्यावतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा जि.प.सदस्या राणीताई लंके यांच्या हस्ते झाला.

नगर – शिक्षण क्षेत्रात वाढत्या स्पर्धांसाठी तोंड देण्याची विद्यार्थ्यांनी तयारी केली पाहिजे. आपण गुणवत्ता सिद्ध केल्यास पालकही आपल्या सर्व गरजापूर्ण करण्यासाठी तयार असतात. पालकांच्या परिस्थितीची जाणिव ठेवून विद्यार्थ्यांनी अनावश्यक गोष्टींकडे दुर्लक्ष करुन अभ्यासावर लक्ष दिले पाहिजे. प्रत्येक मुला–मुलींमध्ये आपले वेगळेपण सिद्ध करण्याची क्षमता असते, त्यादृष्टीने मार्गक्रमण केल्यास यश निश्चित मिळते. आज मुली सर्वच क्षेत्रात बाजी मारत आहेत, ही सकारात्मक गोष्ट आहे. जीवनातील यश–अपयशाचा विचार न करता जिद्द ठेवून आपले ध्येय साध्य करावे. आपले भविष्य घडविण्यासाठी पालक–शिक्षक सर्वांत मोठे मार्गदर्शक आहेत, त्यामुळे त्यांनी सांगितलेल्या गोष्टी प्रत्येक मुला–मुलींनी ऐकल्या पाहिजे. नंदनवन मित्र मंडळाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा सत्कार करुन त्यांना प्रोत्साहन देण्याचा उपक्रम कौतुकास्पद आहे. प्रभागातील विकास कामांबरोबर भावी पिढीला दिशा देण्याचे काम या माध्यमातून होत आहे, असे प्रतिपादन जि.प.सदस्या राणीताई लंके यांनी केले.

माजी नगरसेविका सुवर्णा जाधव व नंदनवन मित्र मंडळाच्यावतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा राणीताई लंके यांच्या हस्ते झाला.

याप्रसंगी कोतवालीचे पो.नि.प्रताप दराडे, शहरप्रमुख संभाजी कदम, विधानसभा शहर समन्वयक दत्ता जाधव, बाळासाहेब बोराटे, सुरेखा कदम, पुष्पा बोरुडे, दिपक खैरे, प्रशांत गायकवाड, सचिन शिंदे, संतोष गेनप्पा, अशोक आगरकर, डॉ.विजय लुणे, नूर आलम, गजानन ससाणे, मीनाताई सत्रे, डॉ.प्राजक्ता जाधव, दत्तात्रय फुलसौंदर, सुरज जाधव, स्नेहल जाधव, मानसी जाधव, अंजली जाधव, हेमंत जाधव, प्रसाद जमदाडे, संतोष डमाळे उपस्थित होते.

याप्रसंगी पो.नि.प्रताप दराडे म्हणाले, विद्यार्थ्यांनी मिळविलेले यश हे सर्वांसाठी प्रेरणादायी व कौतुकास्पद असेच असते. परंतु आज सोशल मिडियाच्या आहारी गेल्याचे दिसून येत आहे. मोबाईलचा उपयोग कसा करावा, हे आपल्या हाती आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी या आभासी दुनियेच्या आहारी न जाता अभ्यासात लक्ष द्यावे. तुम्ही जास्त शिक्षण घेताल तेवढी आपली प्रगती होईल. मुलांनी व्यसनापासून दूर रहावे, त्याचे दुष्परिणाम भंयकर आहेत, याची जाणिव ठेवावी, असे आवाहन पो.नि.दराडे यांनी केले.

यावेळी विशाल जाधव, अवधूत जाधव, आदेश जाधव, सुरज जाधव, राज जाधव, कपिल जाधव, महेश भनभणे, आनंद सत्रे, विकास पटवेकर, वैजुनाथ लोखंडे, विशाल गायकवाड, ओंकार शिंदे, ओंकार जाधव, ओंकार शेळके, विकास सपाटे, अभिजित दळवी, गणेश औशिकर, स्वप्नील घटी, अक्षय गोंधळे, सोहम जाधव, शेखर तांबे, निर्मल साठे, तुषार हारेल, समर्थ भागवत आदिंसह नंदनवन मित्र मंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी इ.१०वी, १२ वी, पदवी, उच्च पदवी, क्रीडा, स्पर्धा परिक्षांतील गुणवंत विद्यार्थ्यांचा प्रशस्तिपत्रक, सन्मानचिन्ह, गुलाबपुष्प देऊन सत्कार करण्यात आला.

प्रास्तविक दत्ता जाधव म्हणाले, गुणवंत विद्यार्थी हा प्रभागाचा अभिमान आहे. त्यांनी मिळलेले यश हे त्यांच्या मेहनतीचे फळ आहे. त्यांचा सन्मान करुन कौतुक करण्याबरोबरच प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न केला आहे. प्रभागातील विकास कामांबरोबरच विविध उपक्रमातून सर्वांशी एक कौटूंबिक नाते निर्माण झाले आहे. मुलांनी मिळविलेल्या यशाचा सन्मान करुन त्यांचे कौतुक केल्याने त्यांना प्रोत्साहन मिळणार असल्याचे सांगितले.

याप्रसंगी संभाजी कदम, बाळासाहेब बोराटे, पुष्पा बोरुडे यांनीही गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक करुन शुभेच्छा दिल्या. सूत्रसंचालन उद्धव काळापहाड यांनी केले तर आभार सुवर्णा जाधव यांनी मानले.

